कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

संपर्क



• पुणे • वर्ष १३ वे • अंक ३ रा • ऑक्टोबर-डिसेंबर २०१७ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

पितांबरी®
अभिनव उत्पादने
फराळ करा पौष्टिक,
खमंग आणि चमचमीत,
पितांबरी संगे
दिवाळीचा
आनंद करा
द्विगुणित!
CIN: U24239MH1989PTC051314.
SaptaShakti
रुचियाना
गूळ
केमिकल फ्री
Ruchiyana
JAGGERY
Chemical FREE
Ruchiyana
Chilli Powder
Ruchiyana
Turmeric Powder
Pitambari Products Pvt. Ltd.
Thane:.022-6703 5555, CRM No:. 022-6703 5564,5699 Toll Free: 180030701044
Now Shop Online On : www.pitambari.com/shop
amazon.in

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

संपर्क

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ ॐ स्थापना १९९१

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १३ वे | ऑक्टोबर - डिसेंबर २०१७ | अंक ३ रा

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर
पुणे ९९७०१ ७४८१८ / ८८०६३ ९५८८० (WhatsApp)

शहर प्रतिनिधी

- श्री. प्रसाद पंडीत, मुंबई, ९८६९१ ५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
- श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
- श्री. अविनाश जावडेकर, नागपूर ९८६०२ ५७३१५
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
- सौ. मानसी मोघे, सातारा, ९०११० ८२३०८
- श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५ ७९४००
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
- श्री. हेमंत हिर्लेकर, पुणे, ९८२२० ४२८६३
- श्री. निळकंठ मुळये, बडोदा, ९८२५६ ८५९७३
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६७९
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९८८७२ ०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - श्री. श्रीगजानन गुर्जर

आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षेसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी **(पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे).** शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक ०५५२१०११०००४००८ असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा **कृपया मनिऑर्डर पाठवू नये.**

संपादक : श्रीगजानन गुर्जर

जाहिरातीचे दर

पान	एकवेळ	चारवेळा
पाव	रु. ४००/-	रु.१५००/-
अर्धा	रु. ८००/-	रु. ३०००/-
पूर्ण	रु. १६००/-	रु. ६०००/-
शुभेच्छा	रु. २५०/-	रु. १०००/-
पूर्ण पान रंगीत	रु. २५००/-	रु. १००००/-
पृष्ठदान	रु. १००/-	-

नियतकालिकाचे नाव : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
पत्ता : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर
मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

अनुक्रमणिका

- संपादकीय ३
- दुर्दम्य इच्छाशक्ती, पराकोटीचे धैर्य - ब्रिगेडियर अनिल तळवलकर (निवृत्त) ४
- विवेक ६
- Reiki as a Preventive and Curative Medicine ९
- रेकी उपचार पद्धती - संक्षिप्त माहिती १०
- रेकी संदर्भात माझे जबरदस्त दोन अनुभव ११

  (किरण शंकर नानिवडेकर)
- शुभ दिपावली एक चिंतन - श्री. दा. टेंबे १२
- हिमाचल प्रदेशची अशीही एक सहल - अनिता अनिल बिनीवाले १३
- श्री भुवलय ग्रंथ १६
- '...अन् स्वप्न साकारलं!' - श्रीपाद टेंबे १८
- प्रमाणामध्ये सर्व काही असावे- रामदास स्वामी १९
- दि. १९ नोव्हेंबर 'गौरवदिना' च्या निमित्ताने २०
- विषुववृत्ताची मुशाफिरी २३
- संस्थावृत्त

  कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे २४

  वार्षिक पारितोषिक वितरण गुणगौरव समारंभ - कऱ्हाडे ब्राह्मण संघ कोल्हापूर २४

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई - निवडणूक २५

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड २५

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक २५

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, हुबळी २६

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २६

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे २७

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ,सातारा २७

  कऱ्हाडे ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी क.ब्रा.संघ रत्नागिरीचा उपक्रम २८
- खाद्यसंस्कृती २९
- गुरूपालट ३१
- नामाकंन - (नॉमिनेशन) ३४

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. - संपादक

संपादकीय

नमस्कार,

ऑक्टोबर-डिसेंबर २०१७ चा 'संपर्क' त्रैमासिकाचा अंक आपल्या हातात देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. पुढील काळात दिवाळीसारखा मोठा सण येत आहे. तसेच १९ नोव्हेंबर रोजी झाशीची राणी लक्ष्मीबाई ह्यांचा जन्मदिन आहे. कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ कार्यकारिणीने मागच्या वर्षी आवाहन केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील बऱ्याच क. ब्रा. संघांनी १९ नोव्हेंबर हा झाशी राणीचा जन्मदिवस 'गौरवदिन' म्हणून उत्तमरीतीने साजरा केला होता आणि महासंघाने सुचविल्याप्रमाणे स्थानिक शालेय विद्यार्थिनींना; त्यांनी मिळविलेल्या प्रावीण्याबद्दल पारितोषिके देऊन त्यांचा सत्कार केला होता. ह्या कार्यक्रमाबद्दलचे सविस्तर वृत्त आम्ही या आधीच्या अंकातून प्रसिद्ध केले होते.

ह्या वर्षीसुद्धा आमचे सर्व क. ब्रा. संघांना आवाहन आहे की, आपण आतापासून १९ नोव्हेंबरच्या 'गौरवदिना'च्या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन करून झाशी राणीचा जन्मदिवस १९ नोव्हेंबरला उत्साहाने साजरा करून त्याबाबतचा सविस्तर वृत्तांत आम्हाला पाठवावा. आम्ही त्यास योग्य प्रसिद्धी नक्कीच देऊ.

ह्या अंकात '१९ नोव्हेंबरच्या निमित्ताने' झाशी राणी लक्ष्मीबाईच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन दिलेले आहे. त्यापासून युवा पिढीसह सर्वांना समाजासाठी चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळेल.

मित्रहो, संपर्क वर्गणीदारांनी आपल्या सभासदत्वाचे 'नूतनीकरण' वेळोवेळी करून घ्यावे, म्हणजे त्यांना 'संपर्क' त्रैमासिक सातत्याने मिळत राहील. शहर प्रतिनिधी, वर्गणीचे नूतनीकरण करण्यास आपणास मार्गदर्शन करतील. तसेच 'संपर्क'मध्ये आपले लेख, प्रवास-वर्णन, कविता, पाककला कृती, प्रबोधनपर साहित्य आमच्याकडे पाठवावे. आम्ही त्यास योग्य ती प्रसिद्धी देऊ.

आपण सर्वांनी नवरात्र आणि दसऱ्याचा सण उत्साहात नुकताच साजरा केला आहे. या वर्षी वरुणराजाचीही चांगली कृपादृष्टी राहिल्याने आणि मुख्यतः वर्षाऋतूच्या चारही मासांत पर्जन्यमान चांगले राहिल्याने शेतकरीवर्ग / बळीराजा उत्तम पिकांची अपेक्षा करीत आनंदात आहे.

थोड्याच दिवसांनी येणाऱ्या दीपावली सणाचे अशाच उत्साहात, आनंदात स्वागत करण्यास आपण सर्व जण उत्सुक आहोत.

हिंदू धर्मीयांच्या ह्या सर्वांत मोठ्या आणि लाडक्या सणासाठी, दीपावलीनिमित्त आमच्या सर्व वर्गणीदार सभासदांना, महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सर्व कऱ्हाडे ब्राह्मण संघ व त्यांचे सर्व सभासद ह्यांना, तसेच आम्हाला सातत्याने सहकार्य करणारे सर्व जाहिरातदार बंधू-भगिनी आणि आमचे सर्व हितचिंतक ह्यांना दिवाळी सणाच्या खूप - खूप हार्दिक शुभेच्छा. ह्या सणाच्या निमित्ताने सर्वांना उत्तम आयुरारोग्य, व्यवसायातील प्रगती, उन्नती, भरभराट आणि सुयश लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

दीपावली शुभचिंतन.

श्रीगजानन गुर्जर
संपादक

दुर्दम्य इच्छाशक्ती, पराकोटीचे धैर्य

निधडच्या छातीने जो रणांगणावर उभा राहतो, तो असतो जवान. पराक्रम त्याच्या रक्तात असतो. असेच एक निर्भय आणि पराक्रमी व्यक्तिमत्त्व म्हणजे मेजर रामा राघोबा राणे. मराठी मातीतला हा अस्सल जवान. भारत- पाकिस्तानच्या पहिल्या

युद्धामध्ये अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांनी शांत चित्ताने परिस्थितीचा सामना केला आणि शत्रूच्या गोळ्या झेलत त्यांनी त्यांचे काम पूर्ण केले. रणांगणावर रणगाड्याखाली अखंड चौदा तास झोपून सुरूंग काढीत मार्ग मोकळा करीत राहिले. अशा या शूरवीर, परमवीरचक्र विजेत्या जवानाची पराक्रमगाथा...

भारत-पाकिस्तानमधील पहिल्या १९४७-४८ मध्ये झालेल्या युद्धात एका मराठा वीराने 'न भूतो - न भविष्यति' असा पराक्रम केला' त्याचे नाव आहे मेजर रामा राघोबा राणे. मेजर राणे यांचा पराक्रम इतर परमवीरचक्र विजेत्यांपेक्षा वेगळा ठरतो, तो दोन कारणांमुळे. एक म्हणजे थल-सेनेतील 'इंजिनिअर्स' या शाखेतील परमवीरचक्र मिळविणारे ते एकमेव अधिकारी आहेत. दुसरे कारण म्हणजे-इतर सर्व विजेत्यांनी दाखविलेले शौर्य हे शत्रूवर चढविलेल्या हल्ल्यात किंवा शत्रूने हल्ला चढविला असताना त्याच्या विरुद्ध संरक्षण करताना दाखविले आहे. मेजर राणे हे एकमेव असे विजेते आहेत की, त्यांनी दाखविलेले धैर्य हे अतिशय कठीण परिस्थितीतील आहे. शत्रूने डागलेल्या गोळ्यांचा वर्षाव अंगावर झेलत, मन शरीर स्थिर ठेवून, खंबीरपणे सुरूंग काढण्याचे अतिशय धोक्याचे काम त्यांनी शांत चित्ताने केलेले आहे. असे काम करणे अतिशय कठीण असत आणि ते काम चार दिवस अव्याहत करणे तर अशक्यप्रायच असते, हे कोणताही लष्करी अधिकारी सांगेल. ज्या वेळेस त्यांनी हा पराक्रम केला, त्या वेळेस त्यांच्यात ती क्षमता अचानक कशी निर्माण झाली किंवा त्यांच्या अंगी ती प्रेरणा अचानक कोठून आली, हे समजण्याकरिता प्रथम आपण त्यांच्या पूर्वायुष्याकडे नजर टाकू या.

त्यांचा जन्म दि. २६ जून १९१८ रोजी धारवाड येथे एका सामान्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील पोलीस कॉन्स्टेबल होते. दि. १० जुलै १९४० ला दुसरे महायुद्ध सुरू असतानाच ते सैन्याच्या 'बॉम्बे इंजिनिअर्स' या शाखेत भरती झाले. प्रशिक्षण चालू असतानाच त्यांनी दाखविलेल्या हुशारीमुळे त्यांना सर्वश्रेष्ठ म्हणून गौरविले आणि त्यांना- 'कमांडरची छडी' बक्षीस म्हणून मिळाली. त्याबरोबरच त्यांची नायक या पदावर बढती करण्यात आली.

दुसऱ्या महायुद्धात त्यांनी भाग घेतला, त्या वेळेस बर्मामधील लढाईत जपानी सैन्याच्या रेट्यामुळे ब्रिटिश सैन्य माघार घेत होते. 'बुधिडोंग' नावाच्या जागी ब्रिटिश सैन्याकडे असलेला दारूगोळा व युद्धसामग्रीचा मोठा साठा जपानी सैन्याच्या हाती पडू नये, म्हणून तो नष्ट करण्याची जबाबदारी राणे यांना देण्यात आली ती त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. परंतु तसे करीत असताना, त्यांच्या तुकडीचा मुख्य सैन्याबरोबरचा संपर्क तुटला. अशा कठीण परिस्थितीतदेखील, हुशारीनं जपानी सैन्याला चकवत त्यांनी आपल्या संपूर्ण तुकडीला सुखरूपपणे मुख्य सैन्यात परत आणले. या कामात दाखविले चिकाटी, धैर्य व उत्तम नेतृत्वासाठी त्यांना हवालदारपदावर बढती देण्यात आली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांच्यातील नेतृत्वगुण बघून भारतीय सैन्याची फेरबांधणी चालू असताना त्यांना १९४७ मध्ये कमिशन देऊन सेकंड लेफ्टनंट या पदावर नेमण्यात आले.

पहिल्या काश्मीर युद्धात लेफ्टनंट राणे यांनी केलेला पराक्रम समजण्यासाठी, युद्धात इंजिनिअर्स कसे व काय काम करतात, हे समजणे गरजेचे आहे. युद्धामध्ये मुख्य सैन्य जेव्हा एखाद्या रस्त्यावरून आक्रमणासाठी पुढे जाते, तेव्हा त्या रस्त्यावर शत्रू वेगवेगळ्या तऱ्हेचे अडथळे निर्माण करतो. डोंगरी भागात दरडी पाडून, मोठाली झाडे रस्त्यावर टाकून, रस्ते किंवा पूल उखडून असे अडथळे निर्माण केले जातात. असे अडथळे काढता येऊ नयेत, म्हणून त्या शेजारी भूसुरूंगदेखील लावले जातात. सुरूंग काढणाऱ्या लोकांना मारण्यासाठी बंदुका, मशिनगन किंवा उखळी तोफांचा भडिमार करण्याचीदेखील व्यवस्था केलेली असते. साहजिकच असे सुरूंग काढण्याचे काम करणारी माणसे

सर्वांत जास्त धोक्यात असतात. लेफ्टनंट राणे यांनी असे धोक्याचे काम तब्बल चार दिवस रोज १०-१२ तास शत्रूने डागलेल्या गोळ्यांच्या भडिमारात पार पडले. कसे, ते आपण सविस्तर बघू या.

दि. १८ मार्च रोजी भारतीय सैन्याने काश्मीरमधील जम्मू प्रांतातील जंगड नावाचे एक महत्त्वाचे ठिकाण ताब्यात घेतले. त्यानंतर फौजेला नौशेरा ते राजौरी या ४८ कि.मी. लांब रस्त्यावर कूच करून राजोरी ताब्यात घेण्याचा हुकूम मिळाला. हा रस्ता डोंगरातून मुनावर तावी नदीच्या काठाने जात असल्याने त्यावर वर वर्णन केल्याप्रमाणे अडथळे निर्माण केलेले होते.

चार डोग्रा ही बटालियन सर्वांत पुढे होती. अडथळे दूर करण्यासाठी त्या बटलियनच्या मदतीला लेफ्टनंट राणे यांची प्लाटून देण्यात आली होती. दि. ८ एप्रिलला रोजौरी-नौशेरा रस्त्यावर कूच केल्यानंतर त्यांना दरड पाडून त्याच्या शेजारी लावलेल्या सुरुंगांचा अडथळा लगेच लागला. तो अडथळा बाजूला करीत असताना राणे यांच्या तुकडीवर, शत्रूने बंदूका, मशिनगन व उखळी तोफांचा मारा सुरू केला. त्यात दोन सैनिक मारले गेले. राणे यांच्यासह पाच सैनिक जखमी झाले. आपल्या जखमांची पर्वा न करता राणे यांनी अडथळा दूर केला व चार डोग्राला मार्ग काढून दिला. चार डोग्राने पुढे कूच केल्यानंतर लगेच काही कि.मी. अंतरावर दुसरा अडथळा लागला. राणे यांनी आपल्या तुकडीच्या मदतीने तोदेखील दूर केला. त्यानंतर चार डोग्राने कूच करावयाचे, अडथळा लागला की राणे यांनी तो दूर करावयाचा आणि परत कूच करावयाची असा क्रम सुरू झाला. प्रत्येक अडथळा दूर करीत असताना राणे यांच्या प्लाटूनला शत्रूच्या दारूगोळ्याच्या भडिमाराचा सामना करावा लागत होता.

दि. ८ एप्रिलच्या रात्री पुढे कूच करणे थांबले, परंतु ९ तारखेला परत तसाच क्रम सुरू झाला. त्या दिवशी त्यांनी सतत १२ तास अशा प्रकारे धोक्याचे काम केले. दि. १० एप्रिलला कूच सुरू केल्यावर एका सपाट भागात त्यांना रणगाडाविरोधी सुरूंग लावलेले आढळले. त्या वेळेस रणगाड्यांना पुढे जाण्याकरिता वाट तयार करण्यासाठी राणे यांनी वापरलेली युक्ती अतिशय धोक्याची, परंतु कल्पक व अप्रतिम अशी होती. तोफा-बंदुकांपासून बचाव करण्याकरिता राणे स्वतः एका रणगाड्याच्या खाली झोपले आणि रांगतरांगत रणगाड्याच्या आडोशात पुढे सरकले. जमिनीवर रणगाडा विरोधी सुरूंग पेरलेला आढळला की, ते पुढे जाऊन तो सुरूंग बाजूला काढत आणि रणगाड्याला पुढे सरकण्याचा इशारा देत. हे धोक्याचे काम त्यांनी सतत १४ तास तहान भूक हरपून केले. दि. ११ एप्रिललादेखील असेच धोक्याचे काम करीत त्यांनी चिनगस नावाच्या ठिकाणापर्यंत चार डोग्राला तसेच रणगाड्यांना रस्ता निर्धोक करून दिला.

या तीन दिवसांत त्यांनी केलेले काम अतुलनीय असे आहे. रोज सतत १४ ते १७ तास त्यांनी अतिशय जोखमीचे, सुरूंग हाताळण्याचे काम मशिनगन व तोफांच्या भडिमारात हळुवारपणे पार पाडले. सुरूंग काढताना त्यावर लावलेले तारांचे सापळे अतिशय हळुवार हाताने दूर करावे लागतात. असे करीत असताना जरादेखील हात हलला किंवा धक्का बसला तरी सुरूंग उडून जबर जखमी होण्याचा किंवा मृत्यू पावण्याचा संभव असतो. असे धोक्याचे काम अविचल मनाने तासन्तास करायला दुर्दम्य इच्छाशक्ती लागते. असे काम करण्यासाठी आपल्या हाताखालील सैनिकांना प्रेरित करण्यासाठी अतिशय कुशल अशा नेतृत्वाची गरज असते.

असे काम सतत तीन दिवस करून राणे यांनी आपल्यातील दुर्दम्य इच्छाशक्ती, अपार प्रयत्न करण्याची ताकद, प्रचंड संयम, पराकोटीचे धैर्य व कुशल नेतृत्व हे सर्व गुण दाखवून दिले. साहजिकच त्यांना या कामासाठी सर्वोच्च शौर्यपदक 'परमवीरचक्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

दि. २५ जून १९५८ रोजी ते मेजर या पदावरून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर देखील ७ एप्रिल १९७१ पर्यंत ते पुनर्नियुक्त अधिकारी म्हणून भारतीय सेनेत कार्यरत होते. दि. ११ एप्रिल १९९४ ला एका किरकोळ आजाराने पुण्याच्या मिलिटरी हॉस्पिटलमध्ये त्यांचे निधन झाले.

मेजर राणे हे जवळजवळ ३०-३५ वर्षे पुण्याचे रहिवासी होते. त्यांच्या नावावरूनच स्पष्ट होते की, ते मराठी होते. त्यांनी राष्ट्राला दिलेले योगदान इतके उच्चकोटीचे होते की, प्रत्येक पुणेकराने व मराठी माणसाने त्यांचे नाव अभिमानाने व गर्वाने घेतले पाहिजे.

-ब्रिगेडियर अनिल तळवलकर
(निवृत्त) सेनामंडल
भ्रमणध्वनी - ९६८९६४९३०२

विवेक

महाभारताच्या उत्तरार्धात एका रूपकात्मक कथेचा उल्लेख आहे. युद्धात निर्णायक विजय प्राप्त करून पांडव आपल्या शिबिराकडे परतले. नंदीघोष नावाच्या आपल्या रथातून श्रीकृष्ण अर्जुन शिबिरापर्यंत आले आणि श्रीकृष्णाने अर्जुनाला रथातून

प्रथम उतरायला सांगितले. आधी सारथ्याने रथातून उतरायचे आणि नंतर योद्ध्याने, असा प्रचलित नियम असताना आणि आजवर तो पाळलेलाही असताना श्रीकृष्णाने आज आपल्याला आधी उतरायला का सांगितले असावे, असा विचार करीतच अर्जुन रथातून खाली उतरला. त्यानंतरही श्रीकृष्णाने त्याला दूर जायला सांगितले. अर्जुन पुरेसा दूर गेला आहे याची खात्री करीत श्रीकृष्णाने हातातले लगाम सोडून दिले आणि स्वतः रथातून उडी मारली. श्रीकृष्ण रथातून बाहेर पडल्यासरशी त्या रथाने एकदम पेट घेतला आणि काही क्षणांतच तो रथ जळून भस्मसात झाला. ही घटनाच इतकी धक्कादायक होती की, अर्जुनासह सर्वच पांडवांना क्षणभर काहीच समजेना. श्रीकृष्णाजवळ धावत जात जेव्हा अर्जुनाने याचे कारण विचारले तेव्हा चेहऱ्यावरचे स्मित ढळू न देता श्रीकृष्णाने उत्तर दिले, ''हे होणारच होते आणि मला याची पूर्ण कल्पना होती. युद्धामध्ये भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य अशा अनेक दिग्गज महारथींनी फ़ेकलेली घातक अस्त्रे झेलल्यानंतरही हा रथ टिकून राहिला, याचे एकमेव कारण म्हणजे मी त्यावर आरूढ होतो. त्यामुळे ज्या क्षणी मी रथाचा ताबा सोडला, त्याच क्षणी तो भस्मसात होऊन गेला, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.''

महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे नंदीघोष हा अतिशय उत्तम बांधणीचा रथ होता. अत्यंत शुभलक्षणी असे अश्व त्यास जोडलेले होते. हा देखणा रथ सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांनी सुसंपन्न होता. मुख्य म्हणजे, अर्जुनासारखा सर्वश्रेष्ठ धनुर्धर या रथावर आरूढ होता. केवळ सारथ्य या कलेचा विचार करायचा झाल्यास, त्या वेळी श्रीकृष्णाइतका अन्य कुशल सारथी मिळालाच नसता, असेही नाही. कर्णाचा सारथी बनलेला मद्रदेशाचा राजा शल्य याचे सारथ्यकौशल्य बघून तर स्वतः श्रीकृष्णानेही त्याचे कौतुक केले आहे. म्हणजेच, अगदी सारथ्यकौशल्यासह अन्य सर्व गोष्टींची उपलब्धता असतानादेखील एका श्रीकृष्णावाचून हा रथ भारतीय युद्धाच्या धुमश्चक्रीमध्ये टिकू शकणार नव्हता, हे निश्चित. अर्थात रथाची बांधणी, अश्वांची गुणवत्ता, शस्त्रास्त्रे, अर्जुनाची धनुर्विद्या, सारथ्यकौशल्य हे सर्व कमी महत्त्वाचे होते, असा याचा अर्थ नाही. फ़क्त या युद्धाचा परिणामच इतका भीषण असणार होता की, हे सर्व असूनही भागणार नव्हते; तर त्यासोबत श्रीकृष्ण हवाच होता. म्हणूनच स्वतःच्या धनुर्विद्येपेक्षाही युद्धात श्रीकृष्णाला आपल्यासोबत ठेवणे, हे अर्जुनाचे महत्त्वाचे कर्तृत्व ठरले.

आपले जीवनही एखाद्या युद्धाप्रमाणेच असते. अदृश्य नियती कायमच आपल्या शत्रुपक्षाची भूमिका बजावत असते. क्वचितप्रसंगी ती अनुकूल भासतेही; पण त्या वेळीही तिच्या पोटात खरेच काय असते, ते देवच जाणे! महाभारताचाच संदर्भ घेऊन सांगायचे तर- वारणावतातील

लाक्षागृहात राहायला जाण्याचा पांडवांना झालेला आग्रह असो वा द्यूत खेळण्याचे कौरवांनी दिलेले आमंत्रण असो यात वरवर दिसत होता तो प्रगाढ स्नेहच, पण नियतीचे अंतस्थ हेतू मात्र निराळेच होते. नियती ही खरोखरीच अनाकलनीय असते. जीवनाच्या समरभूमीवरही असे प्रसंग नित्य येत असतात. अशा प्रसंगांचीही भीषणता कधी कधी इतकी असते की फक्त रथाची बांधणी, अश्व, शस्त्रास्त्रे, स्वत: योद्ध्याची युद्धनिपुणता आणि सारथी इतकेच उत्तम असून भागत नाही; तर डोळ्यांत तेल घालून या जीवनरथाचे संरक्षण करणारा श्रीकृष्णही सोबत असावा लागतो. आपण ठरवले, तर आपणा सर्वांसोबत तो राहू शकतो. या श्रीकृष्णाचे नाव आहे 'विवेक.'

हा विवेक प्रत्येकात असतो; गरज असते ती अगदी लहान वयापासूनच या विवेकाचे उत्तम पोषण होण्याची. व्यग्र आणि वेगवान जीवनपद्धतीच्या नावाखाली या विवेकाला आम्ही कायम कुपोषित ठेवतो. बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेली खडतर आव्हाने पेलताना सर्वत्र अभाव जाणवतो तो या विवेकाचा. म्हणूनच उत्तम घरे, आर्थिक सुसंपन्नता, बुद्धिमत्ता, अद्ययावत साधनसामग्री इ. सर्व असूनही भल्याभल्यांचे जीवनरथ धडधडा पेटताना दृष्टीस पडत आहेत. ज्या संस्कारांतून विवेक वाढीस लागतो, ते संस्कार घराघरांतून हद्दपार होत आहेत. 'जुने जाऊ द्या मरणालागी, जाळून अथवा पुरून टाका' या तथाकथित पुरोगामी विचारसरणीचा गेली काही दशके आमच्या मनांवर इतका पगडा बसला आहे की; आधुनिक जगाशी जुळवून घेताना काही जाळावे लागते हे खरे असले, तरी काही मनोभावे जतनही करावे लागते, हेच आम्ही विसरून गेलो. मग पुरोगामी किंवा उदारमतवादी बनण्याच्या नादात आम्ही जाळण्याच्या या वस्तूंमध्ये नीतिमूल्यांचे स्त्रोत असलेली आमची रामायण-महाभारतासारखी महाकाव्ये टाकून दिली. आमचा गौरवशाली इतिहास आम्ही या आगीच्या भक्ष्यस्थानी पडू दिला. जीवनाचा अर्थ सांगणाऱ्या कालनिरपेक्ष संतसाहित्याला आम्ही मूठमाती दिली. भारतीय संस्कृतीचे अद्वितीयत्व दर्शविणाऱ्या कलांचे बाजार मांडून त्यातून प्राप्त होऊ शकणारा परमानंद आम्ही या आगीत सहजपणे फेकून दिला. याचे पुरावे पाहायचे असतील तर कुठल्याही शाळेत जाऊन मुलांना श्रीराम, श्रीकृष्ण, छत्रपती शिवराय, गुरू गोविंदसिंग, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर अशा राष्ट्रपुरुष/ संतांबद्दल अगदी प्राथमिक स्वरूपाची माहिती विचारून बघा. अशा सर्व विभूतींबद्दल आपल्या मनात आदराची भावना खरोखरीच असेल, तर बहुतांश मुलांची उत्तरे आपल्याला खात्रीने सुन्न करतील. हे ते वय आहे ज्यामध्ये वाचन, श्रवण, चर्चा, संवाद अशा गोष्टींसाठी सर्वांत अधिक वेळ मिळू शकतो परंतु या मुलांच्या दुर्दैवाने शाळेतले शिक्षण 'सिलॅबस'च्या बाहेर जायला तयार नाही आणि 'मोबाईल', टीव्ही किंवा 'इंटरनेट'च्या दुष्टचक्रातून सुटायला घरही तयार नाही. मग ही मुले घडतात ती निरनिराळे क्लासेस आणि माहितीची मुबलक साधने यांच्याच जीवावर. या सर्वांमुळे त्यांच्यात चुणचुणीतपणा येतो, त्यांना व्यवहार कळतो, त्यांच्यात व्यावसायिकताही येते, बुद्धिमत्तादेखील वाढीस लागते; वाढायचा राहतो तो विवेक. हा विवेक कुठेही शिकवला जात नाही, शिकवला जाऊ शकत नाही. नीतिमूल्यांचे कोरडे पाठ शिकविण्यापेक्षा 'असेदेखील जगता येते' नव्हे, जगण्याची खरी रीत हीच असते' हे सांगणारी उदाहरणे तर दिसायला हवीत त्यांना? विवेकाने परिपूर्ण असलेली जीवने श्रद्धायुक्त अंत:करणाने एका विशिष्ट वातावरणात जेव्हा ग्रहण केली जातात, तेव्हा आणि तेव्हाच हा विवेक वाढीस लागण्याची शक्यता असते.

'मदर इंडिया' या चित्रपटाच्या बाबतीत मी कुठे तरी वाचले होते. हा चित्रपट ऑस्करसाठी पाठविण्यात आला होता. 'अतिगरिबीमध्ये आपल्या मुलांची भूक भागविण्यासाठी जेव्हा या मातेवर तिने आपले शील विकावे याकरिता दबाव आणला जातो, त्या वेळी ती हा दबाव झुगारून देते', असा एक प्रसंग या चित्रपटात होता. ऑस्करसाठी या चित्रपटाचे परीक्षण करणाऱ्या एका तज्ज्ञाने म्हणे या प्रसंगावर एक टिप्पणी केली. त्याचे म्हणणे होते की, 'तिने इतकी साधी बाब (?) मान्य करायला काय हरकत होती?, उभ्या आयुष्यात या बिचाऱ्याला चारित्र्ययुक्त जीवन कधी पाहायलाच मिळालेले नसणार, त्यामुळे त्याच्या या अशा टिप्पणीबद्दल त्याला तरी दोष का द्यावा? पण ही घटना दूरच्या देशामधली आहे, असे म्हणून आज आपल्याला हात झटकता येणार नाहीत. कारण आपल्याला मान्य असो अथवा नसो; पण या ऑस्करतज्ज्ञाच्याच वळणाने जाणारा विचार नव्या पिढीतही संक्रमित होऊ घातलाय, हे दुर्दैवी वास्तव आहे. याचे एकमेव कारण म्हणजे, योग्य वयामध्ये रुजू न शकलेला विवेक आणि तो तसा न रुजण्याचे कारण म्हणजे, ज्याज्या गोष्टींमुळे विवेक वाढीस लागू शकतो अशा गोष्टींशी घरांची झालेली फारकत. त्यामुळे हा एक सद्गुण जो जबाबदारी शिकवतो, कर्तव्यांची

जाणीव करून देतो, चांगल्या-वाईटातील नेमका फरक सांगतो; आमच्या मुलांमध्ये रुजतच नाही.

तरुण मुलगा आणि मुलगी 'लिव्ह इन रिलेशनशिप'च्या नावाखाली लग्नाशिवाय एकत्र राहतात, हे जुन्या पिढीला एकदम धक्कादायक वाटते. पण त्याची मुळे येऊन भिडतात ती 'त्यांच्या बालपणीचे वातावरण कसे होते?' याच प्रश्नाशी. नरकासुराच्या वासनेला बळी पडलेल्या सोळा हजार मुलींचे पतीत्व-म्हणजेच पालकत्व- स्वीकारणारा पुरुषोत्तम श्रीकृष्ण जर यांच्या भावविश्वात कधी आलाच नसेल, तर शिल्लक राहते ती केवळ 'लिव्ह इन रिलेशनशिप'च. 'मौजमजा हवी, जबाबदारी नको' ही भावना वाढीस लागते ती विवेकशून्यतेमुळेच. बरे, लग्न झाल्यामुळेही सर्व प्रश्न सुटतात, असे नव्हे. कधी वेळ मिळाल्यास कौटुंबिक न्यायालयांत नुसती चक्कर टाकून या. पाय ठेवायला जागा नाही, अशी रोजची स्थिती तिथे आहे. कडाकडा भांडणाऱ्या बहुतांश नवपरिणीत जोडप्यांचे समुपदेशन करणाऱ्या सरकारी समुपदेशकांना बसायला जागा नाही, अशी तेथील अवस्था आहे. बऱ्याचदा ही समुपदेशक मंडळी या जोडप्यांना जिन्यात, व्हरांड्यात उभे करून समुपदेशन उरकताना दिसतात. 'आई-बाबा, भांडू नका ना' असे कळवळून सांगणाऱ्या छोट्या बालकांनाही हे मुजोर आई-बाप दाद देत नाहीत. मूल म्हणजे वस्तू असल्यासारखी त्याच्या मालकीवरून हमरी-तुमरी चालते. हे यांचे संसार. अत्यंत 'प्रोफ़ेशनल'. हा प्रोफ़ेशनॅलिजम किती टोकापर्यंत गेलाय, याचे एक भीषण उदाहरण नुकतेच वाचायला मिळाले. उच्चशिक्षित मुलगा परदेशात स्थायिक. मुलाची आई मुंबईतील एका उच्चभ्रू सोसायटीत एकटीच राहत असे. वडिलांना जाऊन दोनएक वर्षे झालेली, त्यामुळे आई एकटीच. किती तरी दिवस मुलाचा आईशी संपर्कच नाही. खूप कालावधीनंतर हा मुलगा मुंबईत आला. घराचे दार उघडत नाही, म्हणून ते शेवटी फ़ोडावे लागले. घरात गेल्यावर हाती लागला तो आईचा केवळ अस्थिपंजर! किती तरी

दिवसांपूर्वी या मातेने आत्महत्या केल्याचे नंतर या कर्तव्यदक्ष चिरंजीवांच्या लक्षात आले. अशा प्रसंगांतून तरी 'आपल्याकडे नेमकी उणीव कशाची आहे', ते लक्षात यावे.

जबाबदारी कशाला म्हणतात, कर्तव्य म्हणजे काय, जबाबदारी निभावणे म्हणजे काय असते आणि जबाबदारीपासून पळणे म्हणजे काय असते- हे संस्कारक्षम वयात बिंबलेच गेलेले नाही, हे या सर्व समस्यांचे मूळ दुखणे आहे. इलाज तिथेच व्हायला हवा. 'राहूनच गेले, वेळेतच बसले नाही' असल्या थातुर-मातुर कारणांमुळे परिणाम चुकणार नाहीत, हे कायम लक्षात असू द्यावे.

आज माहितीची, चैनीची मुबलक साधने उपलब्ध आहेत. एका बाजूने विचार केल्यास आधुनिक काळाने तंत्रज्ञानाच्या मदतीने आपल्याला भरपूर सुख सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पण त्यातल्या माझ्या गरजेच्या नक्की किती, हा विवेक उत्पन्न करण्याची क्षमता मात्र कुठल्याही तंत्रज्ञानाकडे नाही. उलटपक्षी, या तंत्रज्ञानाच्या जिवावर मोठे होऊ पाहणारे उद्योजक, व्यावसायिक तर पायघड्या अंथरून 'घ्या, घ्या' म्हणून ग्राहकांच्या मागे लागलेले आपण पाहतो. आयुष्य खऱ्या अर्थाने सुखकर होण्यासाठी माझा प्राधान्यक्रम काय असायला हवा, इतका किमान विचार करण्याच्या पातळीवर आधुनिक जाहिरातबाजी आपल्याला कधी येऊच देत नाही. मग या सुख साधनांच्या मृगजळाकडे धावताना आपण काय काय गमावले, याचा हिशेब करण्याची वेळ येते; तोवर आयुष्याची संध्याकाळ झालेली असते. या संधिप्रकाशात काही गोष्टी जरा लक्षात येतात न येतात, तोच पश्चात्ताप करायलाही वेळ न देता काळरात्र झडप घालते.

आधुनिकता जपण्याच्या नावाखाली आज आमचे सर्व लक्ष आम्ही केंद्रित केले आहे, ते रथाची उत्तम बांधणी (infrastructures), वायुगतीचे सुलक्षणी अश्व (competition), भरपूर शस्त्रास्त्रे (resources), युद्धकौशल्य (skills, competency) आणि सारथी (coaching) या गोष्टींकडे. अभाव आहे तो विवेकरुपी श्रीकृष्णाचा. पण त्याचेच महत्त्व इतके आहे की, त्याच्या अभावामुळे हा रथ त्यातील सर्व सुविधांसह भस्मसात होण्याची भीती आहे. थोडक्या शब्दांत सांगायचे तर -

भौतिकता उपकारक - जेव्हा,
सद्विवेक नित असे जागरूक
त्याविण खोटी सर्व विपुलता,
त्या एकाविण सर्व निरर्थक...
त्या एकाविण सर्व निरर्थक!

- महेंद्र वाघ

Reiki as a Preventive and Curative Medicine

Eastern medical philosophy has always emphasized the superiority of maintaining good health over curing illness. Reiki is a preventive medicine par excellence. It is even more. When practising Reiki on yourself, you experience both it's preventive and it's curative functions at the same time. If you have a disease, Reiki will cure it. If not, Reiki will promote your health and longevity. This preventive-cum-curative quality of Reiki makes it a unique healing system.

It is natural for one to be healthy. It is only when certain parts of our bodies fail to function naturally that sickness occurs. The causes may be from bacteria and viruses, organic (toxins) or psychosomatic. Bacteria and viruses are always present in our bodies, but they are kept in check (sometimes even exploited to do useful work for us) as long as our bodies function naturally.

Toxins are continually clogging our organs, but as long as we function naturally, these toxins will be neutralized by the chemicals produced by our body. Our brain is continually stressed out again, if nature runs its course, we will be adequately relieved after sleep and rest. The Eastern concept of health is also wider than that of the West.

To be healthy is not just to be free from diseases. A person cannot be called



healthy if he/ she is often restless, irritable or extremely forgetful cannot concentrate on any work or sleep soundly and has no zest for work or play. Then how does Reiki promote health? First, it frees us from diseases, it prevents as well as cures illness. Then it helps us to grow emotionally, mentally and also spiritually, giving us the wonderful benefits of health in it's wider sense.

The preventive and curative qualities of Reiki can be summed up into two simple principles: 1) the cleansing of meridians and 2) balancing of the chakras to achieve a harmonious energy flow. How does Reiki prevent or cure contagious diseases? When disease-causing micro-organisms attack certain parts of the body, reserve energy is chanelled to meet these attacks. But if the meridians are blocked, then the flow of reserve energy is hindered and illness results. When using Reiki, you cleanse the meridians, hamonising energy levels and promote a smooth flow of reserve energy to the areas under attack, thus restoring the balance.

Practising Reiki increases our reserve of energy, thus preventing any possible future outbreak of illness.

(Condensed from a letter of Mr. Amol Vijay Joshi received from Japan on 21-01-2003)

श्री. किरण शंकर नानिवडेकर

मो. ९८८१२०१५४३

Reiki - II Degree Holder

रेकी उपचार पद्धती – संक्षिप्त माहिती

रेकी (REIKI) म्हणजे काय ?

रे (REI) म्हणजे विश्वशक्ती आणि की (KI) म्हणजे प्राणशक्ती, म्हणून रेकी (REIKI) काही म्हणजे विश्व-प्राणशक्ती जिचा शोध जपानमधील डॉ. मिकाओ उसुई यांनी खडतर तपश्चर्येने व परिश्रमपूर्वक लावला, त्याची विशिष्ट



अशी उपचारपद्धती विकसित केली आणि तिचा प्रसार जगभर केला.

अ‍ॅक्युप्रेशर, अ‍ॅक्युपंक्चर या उपचारपद्धती आहेत तशीच रेकी (REIKI) ही एक आगळी-वेगळी, साधनविरहित अत्यंत साधी-सोपी पण तितकीच परिणामकारक स्वयंभू उपचार पद्धती आहे.

या ब्रह्मांडांत अमर्याद भरून राहिलेली ही अद्‌भुत ऊर्जाशक्ती कशी घ्यायची व इतरांना (पेशंटला) कशी द्यायची, हे दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरात शिकता येते. यामध्ये रेकी-१ (रेकी चॅनेल), रेकी- २ (रेकी चॅनेल), रेकी- ३ (रेकी मास्टर) व रेकी-४ (रेकी टीचर) असे चार टप्पे असतात. रेकी-१ व रेकी-२ प्रशिक्षण शिबिरांसाठी किमान २५-३० सदस्य इच्छुक असतील, तर असे शिबीर आयोजित करता येते. शिबिरासाठी फी असते (त्यांत प्रशिक्षण साहित्य, प्रमाणपत्र, प्रात्यक्षिके, भोजन व्यवस्था, जागाभाडे, प्रशिक्षकांचे मानधन इ.चा समावेश असतो).

रेकीमध्ये आपल्या शरीरातील आपादमस्तक (सहस्रार चक्र- Crown Chakra), (आज्ञाचक्र- Third Eye), (विशुद्ध चक्र -Throat Chakra), (अनाहत चक्र- Heart Chakra), (मणिपूर चक्र- Solar Plexus), (स्वाधिष्ठान चक्र- Hara) आणि (मूलाधार चक्र- Root Chakra) अशा सात ऊर्जाचक्रांना वरील पद्धतीने किमान तीन ते पाच मिनिटे व गरजेनुसार थोडा अधिक वेळ रेकी दिली जाते.

रेकीची प्रार्थना, मनाची एकाग्रता, कांही चिन्हमंत्रांचा उपयोग व तळहातांचा स्पर्श याद्वारे रेकी उपचार केले जातात. ज्यांचा यावर विश्वास आहे व जे स्वेच्छेने उपचार करून घेऊ इच्छितात, त्यांनाच रेकी उपचार दिले जातात. मानसिक ताणतणाव, नैराश्य, आत्मविश्वास गमावणे, भीतीपासून मुक्तता, स्मरणशक्ती कमी होणे, निद्रानाश इ. विकारांवर रेकी उपचारांचा चांगला परिणाम अनुभवास येतो. माझ्याकडे अशी उदाहरणे आहेत. रेकी उपचार किमान एक आठवडा व कमाल २१ दिवस (एक पूर्ण चक्र) असे केले जातात.

मी स्वत: १९९८ मध्ये रेकी-२ (रेकी चॅनेल) लेव्हलचे प्रशिक्षण घेतले आणि आजपर्यंत १०-१२ पेशंटवर यशस्वीपणे रेकी उपचार केले आहेत. मार्च २०१४ मध्ये पाषाण येथे पहिले रेकी-१ प्रशिक्षण शिबिर मी आयोजित केले होते, ज्यामध्ये ११ स्त्रिया व ७ पुरुषांनी सहभाग घेतला. ज्यांना रेकी उपचार घ्यायचे असतील, त्यांनी अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क करावा. अटी व फी लागू.

रेकी संदर्भात माझे जबरदस्त दोन अनुभव

मी स्वत: रेकी ।। डिग्रीधारक असून १९९८ पासून रेकी प्रॅक्टीस करीत आहे. विनंतीनुसार गरजूंना रेकी ट्रीटमेंटही देतो. माझे सर्व कुटुंबीयांनीही (पत्नी, दोन्ही मुले, जावई, सून,) रेकी प्रशिक्षण घेतले आहे. ही विश्वशक्ती (रे)+ प्राणशक्ती (की) = रेकी किती परिणामकारक आहे, याचे दोन जबरदस्त स्वानुभव खाली देत आहे. दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरांत रेकी शिकता येते.

अनुभव पहिला

सप्टेंबर २००१ मध्ये आम्ही कोल्हापूरहून पुणे येथे स्थलांतर करण्याच्या गडबडीत असताना सौ. रोटे नावाच्या एक बाई तळहातांत मावेल इतक्या लहान अशा त्यांच्या नवजात बाळाला त्यांचे नातेवाइकांच्या ओळखीने रेकी उपचारांसाठी माझ्याकडे घेऊन आल्या होत्या. नवसाने झालेले बाळ व त्यांतही मुदतपूर्व प्रसूतीची केस. बाळाचे शरीर काळे ठिक्कर व खूपच सुरकुतलेले. छातीची मंदशी हालचाल एवढेच काय ते जिवंताचे लक्षण, मला प्रश्न पडला की, त्याला कशी ट्रीटमेंट द्यायची? शिवाय भीतीही वाटत होती की, काही कमी जास्त झाले तर? पण त्या बाई माझ्याकडेच ट्रीटमेंट घ्यायची, असा हट्ट धरून बसल्या होत्या. शेवटी त्यांना स्पष्ट कल्पना दिली व त्यांच्या पूर्ण जबाबदारीवर बाळाला रेकी द्यायला सुरवात केली. एका आठवड्यानंतर बाळाच्या कातडीवरील सुरकुत्या कमी झालेल्या व कातडीचा रंगही थोडा उजळलेला दिसला. एक आश्चर्य घडत होते. रक्तप्रवाहातील अडथळे, गाठी नष्ट होऊन तो सुरळीत, नियमित सुरू झाला होता. बाळ सुधारू लागले होते. पुढेही एक आठवडाभर त्याच्यावर उपचार चालू ठेवले बाळाच्या कातडीवरील सुरकुत्या पूर्ण नाहीशा होऊन त्याचा रंगही खूप उजळला होता आणि ते हळूच डोळेही उघडून पाहत होते. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसत नव्हता. मागील सप्टेंबर, २०१३ मध्ये कोल्हापूरला गेलो होतो, तेव्हा सहज चौकशी केली तेव्हा समजले की, तो बाळ आता १२ वर्षांचा शाळकरी मुलगा झाला आहे.

अनुभव दुसरा

कोल्हापूरला आमच्या घरासमोर श्री. भोगटे नावाचे किराणा दुकानदार राहत होते. पत्नी व दोन लहान मुले असा छोटा संसार. भावाभावांच्या इस्टेटीच्या वाटण्या झाल्या होत्या, तरी एकाच इमारतीत स्वतंत्र संसार होते. हा उदय नांवाचा भाऊ अतिशय आळशी होता. सकाळी ९-९।। शिवाय उठायचे नाही, दुकानांत वेळेवर जायचे नाही, मग काय... उधारी वसूल होईना व धंदा बसला, दुकान बंद पडले. बायको सतत काळजीत. संसाराचे, मुलांचे कसे होणार? तिला कोठून तरी कळले की, आम्ही रेकी नांवाचे कसले तरी उपचार करतो, म्हणून ती आमच्या घरी चौकशीला आली. एकदा मिस्टरांना बरोबर घेऊन गप्पा-टप्पा, चहासाठी या, असे सांगितले व त्याप्रमाणे त्या आल्या. दोघांनाही रेकी उपचारांबद्दल माहिती दिली. उदयकुमार प्रथम तयार नव्हते, पण बायकोच्या आग्रहावरून कसेबसे तयार झाले.

दोन दिवसांनंतर मी व माझी सौ. अशा दोघांनी एकत्रितपणे त्यांना रेकी द्यायला सुरवात केली. काय फरक वाटतो ते त्यांनी लगेच न सांगता दुसऱ्या दिवशी सांगायचे, असे ठरले. २-३ दिवस काही नाही, काही फरक नाही असे म्हणाले. त्यानंतरच्या दिवशी ट्रीटमेंट देत असताना त्यांना दरदरून घाम सुटला, ते थडथड उडायला लागले, आवरता आवरेनात. माझी सौ. व त्यांची बायको दोघी घाबरून गेल्या. पण मला ही त्यांची रिॲक्शन अपरिचित नव्हती. त्यांचे मनातील भीति, दडपण, कोंडमारा इ. चा एकदम प्रचंड प्रमाणात निचरा होत होता. हे सुचिन्ह होते! डोळ्यावर पाणी मारल्यानंतर पाच मिनिटांनी त्यांनी डोळे उघडले. खूप शांत झालेले व फ्रेश वाटत होते. चहा दिला व दोघांना घरी पाठविण्यापूर्वी त्यांच्या सौ. ला कानमंत्र दिला की, उदयकुमारना रोज सकाळी सहा वाजता सक्तीने उठवून एक तासभर मोकळ्या हवेत बाहेर फिरायला पिटाळायचे. दिनक्रम सुरू झाला अन् त्याचे सुयोग्य परिणाम दिसायला लागले. आम्हा सर्वांनाच आनंद झाला. त्यांची सौ.देखील खूप सुखावली. त्यांच्या संसाराची गाडी रुळावर येत होती.

त्यानंतर श्री.रा.रा. उदयकुमार नियमितपणे दुकानाकडे जायला लागले. दुकानाचा परत जम बसू लागला, उधारी वसूल होत गेली. त्यांचा आळस नष्ट होऊन आत्मविश्वास आला. पुढे त्यांनी डिलिव्हरी व्हॅन घेतली आणि आसपासच्या लहान गावांतील छोट्या दुकानदारांना माल-पुरवठाही करू लागले. पुन्हा काही दिवसांनी त्यांची सौ. आमच्या घरी हजर झाली. म्हणाली ''आतां त्यांना व गाडीलाही रेकी द्या. बाहेर माल द्यायला गेले की रात्री १-१।। वाजेपर्यंत घरी परत येत नाहीत. इथे माझा जीव टांगणीवर..!'' मग त्या व आम्ही सगळेच हसू लागलो. रेकीने आपल्या शक्तीची चुणूक दाखविली होती. धन्य! धन्य!!

किरण (रेकी-२ धारक रेकी चॅनेल) पाषाण, पुणे-४
भ्रमणध्वनी ९८८१२०१५४३

शुभ दिपावली एक चिंतन

दिवाळी आली की सर्वत्र आनंद, उत्साह, प्रकाश, फराळ, नवे कपडे, डिओ, अत्तराचा सुगंध, दुकांनातील गर्दी, खरेदी, एकूणच काय.. सर्वत्र आनंदी आनंद.

जसा काळ बदलत गेला तसा माणसाने स्वतःमध्ये वागण्यातविचारात विलक्षण आणि योग्य तो बदल केला.



काळानुरूप जगण्याची हीच योग्य अशी व्याख्या असायला हवी. पण काही गोष्टींत आणखी बदल व्हायला हवेत असे माझे वैयक्तिक, किंबहुना सुजाण नागरिकांचे मत असेल, असे मला दर दिवाळीला वाटत असतं.

आपण शहरी भागात राहतो. रोजचे कामावर जाणे-येणे, गर्दी, धूर, प्रदूषण, गोंगाट ह्या सर्व गोष्टींमुळे त्रासलेले असतो. कधी घरी जाऊन शांतपणे झोपतो असं वाटतं. ह्याला कारण वाहनांची बेसुमार वर्दळ, त्यातून जीव गुदमरवून टाकणाऱ्या धुराचे प्रदूषण. अशातच दिवाळी आली किंवा कुठल्याही कारणाने उडविल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आवाजाने निसर्गात जे काही लहानसहान पक्षी शिल्लक राहिले आहेत, ते घाबरुन हकनाक बळी जातात. फटाके फुटल्यानंतर होणारा कचरा त्याबद्दल तर बोलायलाच नको. त्याहूनही मन उदास होते ते लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीचे चित्र असणारे फटाके फोडून त्या चित्राचा चिंधड्या जेव्हा पायाखाली तुडविल्या जातात, तेव्हा. म्हणजे किती विरोधाभास!!

सरकारी यंत्रणा सर्वसामान्यांच्या हितासाठी बरेच कायदे वेळोवेळी बनवते, पण सुजाण नागरिक या नात्याने फटाके उडविण्यावर योग्य प्रतिबंध आपण स्वतःवर घातला पाहिजे. ठार बहिरे करणाऱ्या कर्णकर्कश फटाके उडविण्यात काहीच अर्थ नसतो. शोभेचे फटाके पण एका मर्यादेपर्यंत उडवायला हवेत. प्रदूषण आणि तापमानवाढीचे दुष्परिणाम याविषयी आपण स्वतःला व येणाऱ्या पिढीला सावध करणे आवश्यक आहे. निसर्गाकडून आपल्याला वारंवार मिळणाऱ्या संकेतांकडे दुर्लक्ष करणे भविष्यात परवडणार नाही. या दुष्परिणामांना आपण जर दूर ठेवण्यात यशस्वी झालो, तर परदेशी बनावटीचे आकाशदिवे, फटाके, मेणाच्या पणत्यांचा वापर आपोआपच कमी होईल आणि बाजारपेठांमध्ये घुसखोर करणाऱ्या शेजारी देशांना वचक बसून धडा शिकवल्या जाईल.

फटाक्यांचा खर्च वाचवून आपण कुणा गरजूची मदत करू शकतो. उदाहारणार्थ-एखाद्या वृद्धाश्रमात जाऊन तेथील वृद्धांना किंवा गरीब विद्यार्थ्यांना उपयोगी वस्तू जसे पाणी शुद्ध करणारे फिल्टर, किराणा वस्तू, थंडी-पावसापासून रक्षण करणारे कपडे- अशा अनेक प्रकारे आपण त्यांना मदत करू शकतो. त्यांच्याशी गप्पा मारून, त्यांच्यासोबत मिसळून आपण त्यांचा आनंद वाढवू शकतो. ही फारच साधी गोष्ट आहे. या मदतीने समाजातील उपेक्षित घटकांनादेखील आनंद होईल आणि आपण समाजातील दुर्लक्षित घटक नाही या जाणिवेने त्यांना व आपल्याला जो आनंद होईल, तो अवर्णनीय असेल ह्यात शंका नाही. सर्वांचीच दिवाळी आनंदाने उजळून जाईल.

आपणा सर्वांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

श्रीपाद दामोदर टेंबे, पुणे
मो. : ९१५८० ८८०४२

हिमाचल प्रदेशची अशीही एक सहल

सकाळी आठ वाजता आम्ही चंडीगडहून निघालो आणि रात्री आठ वाजता डलहौसीला पोचलो. बसने ३५० किलोमीटरचा प्रवास केला. चहापानासाठी दोनवेळा आणि जेवणासाठी एकदा वाटेत थांबलो होतो. प्रवास तसा सुखकारक आणि नयनरम्य होता. हिमाचल प्रदेशला निसर्गाचे भरपूर वरदान मिळाले आहे. भरपूर हिरवाईने मनाचा ताजेपणा ठेवण्यात मदत केली. सुदैवाने या लोकांना व्यावसायिकतेचे वारे लागले नसल्याने निसर्ग आपले सौंदर्य टिकवून आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी बहावा बहरला होता. येथील बहावाची पिवळी छटा अधिक मोहक वाटली. क्वचित गुलमोहर पण गच्च फुललेला पाहिला. बाकी इथल्या वनस्पती फारशा परिचयाच्या वाटल्या नाहीत. एकूणच बाजारीकरणाचा फारसा प्रभाव या प्रदेशावर नाही. डलहौसीचे तापमान आल्हाददायक आहे. रस्ते खूपच अरुंद आणि गर्दी अतिशय त्रासदायक आहे. एकंदरीत शहर विकास रचनेचा कोणताही विचार नसल्याने भविष्य उज्ज्वल नाही आणि विकासाला पण मर्यादा आहेत एवढेच. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता डलहौसीहून खज्जर तळे (लेक) पाहण्यासाठी रवाना झालो. प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र गाडी आणि चालक होता. चालकाचे वाहनकौशल्य कौतुकास्पद होते. अत्यंत अरुंद, वळणावळणाचे रस्ते, त्यांना असणारे तीव्र चढउतार आणि वाहतुकीची कमालीची बेशिस्त यातून मनाचा तोल किंचितही ढळू न देता वाहनचालक गाडी चालवत होता. धन्य ती माऊली.

छायाचित्रकार आपल्या कलेची चुणूक दाखविण्याच्या प्रयत्नात होते. प्रवासी पण चित्रविचित्र पोषाख घालून त्यांच्या पोटापाण्यासाठी मदत करत होते. मला त्यांचे कौतुक वाटत होते.

खज्जर तळ्यापाशी पोचल्यावर माझा जरासा अपेक्षाभंगच झाला. तळ्यातील पाण्याचा साठा कदाचित महिनाभर पुरेल एवढा असावा. त्या पाण्याच्या काठाने माझ्यासारखे अनेक पामर गाई, म्हशी आणि गाढवे याबरोबर बागडत होते. एकूण वातावरणात शेणखत आणि घोड्याची लीद यांचा दरवळ पसरला होता. मरतुकड्या घोड्यावर बसून घोडेस्वारीचा आनंद काही हौशी लुटत होते. काही शूरवीर गरीब बिचाऱ्या सशांना टोपलीत बसवून त्यांच्याबरोबरच छायाचित्रे घेण्यात धन्यता मानत होते. मी फक्त त्या सशांची केविलवाणी अवस्था पाहून अस्वस्थ होत होते.

सरोवराच्या भोवताली गाड्यांचे ताफे बेशिस्तपणे उभे होते. उरलेले काही वेळ घालवण्यासाठी चटक-मटक पदार्थांचा आस्वाद घेत होते आणि कचरा इतस्ततः टाकून धन्य होत होते. तापमान मात्र सुसह्य होते. सरोवराच्या भोवताली उंचच उंच देवदार आणि ओक वृक्ष मनाला प्रसन्न करत होते. त्याच्या पाठीमागे हिरव्यागार पर्वतरांगा! मी त्या निसर्गदेवतेला मनोमन प्रणाम केला आणि बाकी सगळ्या गोष्टी विसरून गेले.

माझ्या अनुभवानुसार सह्याद्री पर्वतरांगा जास्तीत जास्त आठ-दहा तास प्रवास केल्यावर संपतात. बहुधा त्याच्या सर्व दिशेने प्रवासाचा अनुभव घेतला आहे. पण हिमाचल प्रदेश निश्चितच खूपच विस्तीर्ण आहे. गेले तीन दिवस आम्ही या डोंगर-कपारीतून प्रवास करीत आहे, पण याचा विस्तार संपण्याचे नाव नाही. पुढच्या पाच दिवसांचा प्रवास असाच असणार आहे. आपण किती सीमित जगात वावरत असतो, याचा आणखी एक प्रत्यय आला!

पुढच्या दिवशी सकाळी डलहौसीला रामराम करून धर्मशाळा मुक्कामी आलो. साडेपाच तासांत अवघे १३५ किमी. अंतर पार केले. उंचच उंच डोंगर, पर्वतरांगा आणि त्यांच्या रूपातील विविधता पाहून माझ्यासारखी बाई अक्षरशः थक्क होते. मनुष्यस्वभाव सुद्धा काही कमी नाही, या विविधतेला पुरून उरला आहे. जिथे जिथे म्हणून शक्य असेल तिथे तिथे वस्ती केली आहे. इतक्या अडचणीच्या ठिकाणी आपले दैनंदिन व्यवहार पार पाडणे किती अवघड जात असेल, याची कल्पनाच करता येत नाही. हीपण आयुष्याची एक बाजू!

जेव्हा पर्वतरांगांतून रस्तेबांधणी करतात, तेव्हा बऱ्याच मर्यादा येत असाव्यात. एक तर नैसर्गिक आणि तितक्याच महत्त्वाच्या आर्थिक घटकाशी निगडित, याचा मला येथे सतत अनुभव येत राहिला. कारण रस्ते निमुळते आणि चिंचोळे! कदाचित हे शब्दसुद्धा अपुरे पडतील, कारण जेमतेम एकच वाहन जाऊ शकेल, येवढीच रस्त्यांची रुंदी! त्यात तीव्र चढउतारांची भर!! या परिस्थितीत वाहन चालकाचे कौशल्य अविश्वसनीय वाटते.

आतापर्यंतच्या हिमाचल प्रदेशच्या प्रवासात चौपदरी रस्त्यावर जाण्याचा योग आला नाही. हायवे परिसस्पर्श या भूमीला झाला आहे किंवा नाही ?

मला तशी निश्चितच माहिती नाही. नॅशनल हायवेच्या बांधकामाने पर्यावरणाला धक्का दिला; पण प्रवासाची सोय आणि मजा वाढवलीच, हे गेल्या चार दिवसांच्या प्रवासाने विशेष लक्षात आले. याशिवाय आणखी एक गोष्ट लक्षात आली. संपूर्ण डोंगराळ प्रदेशाच्या प्रवासात केवळ एकच बोगदा लागला. आपल्या सह्याद्रीच्या परिसरात अनेक बोगदे लागतात.

हायवेचा विषय निघाला तर आपल्या मुंबई - बंगलोर हायवे बद्दल काही सांगण्याची गरज नाही. आपण सारेच सुपरिचित आहात. पण चेन्नई - पाँडी सुपर एक्स्प्रेस हायवेचे कौतुक काय वर्णावे! बंगालच्या महासागराला बराचसा समांतर हैदराबाद विमानतळाकडे जाणार रस्ता तर जणू आपण परदेशी तर आलो नाही ना, अशी जाणीव करून देतो. ऐन उन्हाळ्यात भोपळला जाण्याचा योग आला. लाल फुलांनी भरलेल्या गुलमोहराने नजरसुखाला अक्षरशः तृप्त केले. राजस्थान राज्यातील सुंदर हायवेवर कुठेही टोल द्यायला लागला नाही, त्यामुळे तो अधिक स्मरणात राहिला. उत्तर प्रदेशमध्ये तर कायद्याला धाब्यावर बसवून हायवेवर प्रवासी उलट्या दिशेने येतात आणि प्रवासाची धास्तीच वाटायला लागते.

तर शेवटी काय- अजून तरी हायवे दर्शन हिमाचल प्रदेशात झाले नाही. इति रस्तापुराण समाप्त!

सर्व प्रवास घाटातून आणि वळणाचा, चढ-उताराचा, कूर्म गतीने दीर्घ काळ चालल्याने त्याची नवलाई व अप्रूप यामध्ये परिणती होऊ लागली. पण प्रवास करण्याची हौस आणि खोड!

त्यानंतरच्या दिवशी सकाळी आठ वाजता धर्मशाळेपासून निघून मनालीला रात्री दहा वाजता पोचलो. संपूर्ण प्रवास बसचाच. मध्यंतरी जेवण आणि चहापाणी यासाठी थोडा मुक्काम केला.

हे सर्व काही असले, तरी या संपूर्ण प्रवासात मी माझ्या मित्रपरिवारच्या संपर्कात सतत होते. त्यांनी पण माझ्याशी अत्यंत संयमपूर्ण संवाद साधला. याचे सर्व श्रेय नव्या आणि सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाला! दूर-दूर पर्यंत उंच डोंगरमाथ्यावर संदेश पोचवणाऱ्या मनोऱ्यांची वस्ती! आपण सगळे या माहिती तंत्रज्ञानाचे नकळत गुलाम झालो.

धर्मशाळा ते मनाली एकूण अंतर २५० किमी. या संपूर्ण प्रवासात वस्तीपासून फार दूर जात असल्याची जराही जाणीव फारशी झाली नाही. सर्व दूर कडेकपारीत घरकुले दाटीवाटीने वसली आहेत. कदाचित वाढत्या लोकसंख्येचा हा दबाव असू शकतो. मग मनात आले की- दिवस भरत आलेल्या एखाद्या बाळंतिणीला सूतिकागृहापर्यंत कसे पोचवत असतील, कारण दळणवळणाची पुरेशी सोय नाही. रोज विद्यार्थ्यांना शाळेसाठी करावी लागणारी पायपीट! दैनंदिन व्यवहार किती कष्टाचे! पण मनुष्यस्वभाव असाच आहे, तो सगळ्यांना पुरून उरतो आणि तेच खरे आयुष्य! जी माणसे येथे जन्माला आली आणि याच भूमीवर लहानाची मोठी झाली, त्यांना समुद्रसपाटीवर येऊन राहण्याची संधी मिळाली; तर त्यांच्या भावना काय असतील?

मनालीमधील Golden Tulip ह्या निवासातील आजचा तिसरा दिवस! आणखी एक दिवसाच्या निवासानंतर पुढे सिमल्यासाठी रवाना होऊ.

हे सर्व लिहिताना भाषेच्या गंभीर चुका माझ्या ध्यानात आल्या आहेत. त्या माझ्या मर्यादा आपण समजून घ्याल!

निवासस्थान तसे ठीकच आहे. सहप्रवासी मिळून-मिसळून वागणारे, काही समवयस्क आणि एकमेका साह्य करू, अवघे - - -. त्यामुळे अनोळखी मित्रपरिवाराबरोबर हा सुंदरसा मेळावाच आहे.

सध्याचे इथले हवामान बालकवींच्या 'श्रावण मासी, हर्ष मानसी' कवितेत वर्णन केल्याप्रमाणे आहे. अनेक ठिकाणी निरनिराळ्या छटा असणारे, अक्षरशः पानांपेक्षा फुले अधिक असणारे गुलाबाचे ताटवे दिसतात. आमच्या खोलीतून हिरवीगार, रम्य टेकडी दिसते. तिच्या पायथ्याशी देवदार वृक्षांची दाट झाडी आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बियास नदीचा लयबद्ध खळखळाट आणि सुस्वर नाद कानाला नैसर्गिक संगीताचे सुख देतो. तिचे खिडकीतून होणारे दर्शन मला माझ्या बालपणीच्या रम्य आठवणींचे स्मरण देत राहते.

मला कुठल्याही नव्या ठिकाणी गेले की, चालत फेरफटका मारायला आवडते. इच्छा असूनही मनालीमध्ये तो आनंद घेता येत नाही; कारण ते अवखळ गल्लीबोळ; जिथून चालताना माझा रक्तदाब अनियमित चालल्याची जाणीव करून देतो. मग न राहून वाटत राहते एवढ्या वाढत्या निवासी इमारती बांधणारे व्यावसायिक आणि अन्य जनता सरकारला उत्तम रस्तानियोजनसाठी का नाही भाग पाडत? मी मनालीच्या ज्या भागातून हिंडत होते, तेव्हा वाटत होते पुण्याच्या तुळशीबागेतून मी हिंडत आहे! मनालीतील सर्व रस्ते अक्षरशः असेच

आहेत, ज्या रस्त्यावर बस चालवण्यास परवानगी नाही, कारण बस चालवणेच अशक्य आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक नाही. म्हणून खासगी गाड्यांचे राज्य रुजू आहे.

मनालीत राहणारे किती लोक आपण सांगितलेली वेळ पाळू शकत असतील? किवा एखाद्या रुग्णाला हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यास त्याला रुग्णालयात सत्वर दाखल करता येईल का? रुग्णवाहिका रुग्णाला रुग्णालयात सत्वर पोचवू शकत असतील का? हे सर्व प्रश्न मनाली मुक्कामी माझ्या मनात सतत पिंगा घालीत आहेत. याचे एकमेव कारण माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात रस्त्यावरील वाहतूक वर्दळीची एवढी दुरवस्था मी मनालीत प्रथमच पाहिली.

वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. सदा सर्वकाळ रस्त्यावर वाहतूक तुंबलेली असते. कारण अत्यंत अरुंद, वळणावळणाचे आणि चढ-उताराचे रस्ते! माझा सर्वांत अधिक काळ रस्त्यातील गर्दीवर व्यतीत झाला. सर्व सहप्रवासी परिस्थितीला अगदी निर्विकारपणे तोंड देत होते. एक जण तर हताशपणे उद्गारला- मनालीत काही सुधारणा होणार नाहीत.

निसर्गाचे वेड आणि आवड आपल्याला सगळ्यांना असतेच, पण दीर्घ काळ त्याच्या संगतीत शहरवासीय राहू शकत नाहीत; मग मानवनिर्मित प्रेक्षणीय स्थळे शोधली जातात. पण म्हणावा असा त्यांचा पुरवठा नाही. यात्रा (प्रवासी कंपन्यांनी) व्यावसायिकांनी त्यातून प्रवासी भावनिकांना रुचेलसा मार्ग काढला आणि तो होता देवदर्शनाचा! व्यवसायाच्या दृष्टीने हा खूप फायद्याचा मार्ग ठरला! मग काय- प्रवासाच्या मार्गावर जेवढी म्हणून मंदिरे होती, त्यांचे दर्शन घेतले आणि पदर अगदी पुण्याने भरून वाहिला. (भरपूर पुण्य पदरात पडले.)

निसर्गाची उत्तम देणगी लाभलेल्या मनालीकरांना त्याचा यथायोग्य उपयोग करून घेता आला नाही, हेच खरे दुर्भाग्य! येथील दळणवळणव्यवस्था निराशाजनक आणि तितकीच त्रासदायक आहे. मी पुन्हा येथे कधीही येणार नाही, असा निश्चय केला आहे.

असं म्हणतात, मनूच्या नावावरून या गावाचे नाव मनाली पडले. मनूचे मंदिर पण येथे आहे. तसेच गायत्रीचे मंदिर आहे, जिथे गायत्री मंत्र चोवीस तास चालू होता. सर्व गायक वर्गाने- गायत्री मंत्राचा प्रभाव श्रोत्यांवर वटवला आहे. वशिष्ट ऋषींचे मंदिर येथे आहे. त्याला लागून गरम पाण्याचे कुंड थंड प्रदेशात आहे.

मनालीमध्ये हिडिंबेचे (भीमाची पत्नी) मंदिर पाहण्याचा योग आला. ही राक्षसीण येथील मूळ रहिवासी आहे. भारतात हिचे हे एकमेव मंदिर आहे. मंदिराचा परिसर जराशा उंचीवर, हिरव्यागार गच्च वनराईत आहे. खूप उंच देवदारचे वृक्ष अगदी दाटीवाटीने उभे आहेत. वातावरणातील प्रसन्नता जिवाला सुखावत होती. संपूर्ण मंदिर देवदार लाकडाचे आहे. त्या पलीकडे ५०० मीटर अंतरावर हिडिंबा मातेला- एकाकी वाटू नये म्हणून घटोत्कचाचे मंदिर आहे.

न राहून मला दक्षिण भारतातील मंदिरांची सतत आठवण येत होती. काय ती भव्यता आणि सौंदर्य! काही पुराण- कालीन मंदिरांच्या शिल्पाने मनात कायमचे घर केले आहे. बिर्लांनी तर सुंदर, स्वच्छ मंदिराचा वस्तुपाठच जणू भाविकांसाठी मांडला. मंदिरांच्या वास्तूचे काम इस्कॉनने अक्षरशः जगभर डोळ्यांत भरण्यासारखे केले आहे.

लेखिका

श्रीमती अनिता अनिल बिनीवाले

सन १९५५ राधिका | **सन २०१५ मोनिका**

डोळे हे जुलमी गडे रोखुनी मज पाहू नका ।
कशिदा मी काढू कशी होतिल बहू त्यात चुका ।।

बाहू तुझे पुष्ट गड्या उचलून मज घेशिल का ।
नाहीतर शोधिन मी गुगलवर दुसऱ्या युवका ।।

५ तपांच्या काळात घडून आलेले हे प्रणय अभिव्यक्तीतील अंतर !

प्रगति की ऱ्हास?

-विनायक पां. गुर्जर-पाध्ये

मो. : ९०११० ८३०७३

श्री भुवलय ग्रंथ

आपल्या भारताच्या ज्ञानभांडारात इतक्या जबरदस्त आणि चमत्कारिक गोष्टी लपलेल्या आहेत की, त्या बघून मन अक्षरशः थक्क होतं..! 'हे ज्ञान आपल्याजवळ आलंच कुठून?' अशा प्रश्नात आपण गुरफटले जातो. मग, 'त्या काळात हे असलं भारी ज्ञानभांडार आपल्याजवळ होतं, तर आता का नाही..? कुठं गेलं हे ज्ञान..?' हे प्रश्न आपल्याला सतावत राहतात!

याच श्रेणीतला असा अद्भुत ग्रंथ आहे- 'सिरी भूवलय'. किंवा श्री भूवलय- जैन मुनी आचार्य कुमुदेंदू ह्यांनी रचलेला. कर्नाटकात जेंव्हा राष्ट्रकुटांचं शासन होतं, मुस्लिम आक्रमक यायला बरीच वर्षं होती आणि सम्राट अमोघवर्ष नृपतुंग (प्रथम) हे जेंव्हा राज्य करत होते; त्या काळातला हा ग्रंथ. अर्थातच सन ८२० ते ८४० च्या काळात केंव्हा तरी लिहिला गेलेला..!

मात्र मागील हजार वर्षे हा ग्रंथ गायब होता. कुठे कुठे याचा उल्लेख यायचा, पण ग्रंथ मात्र विलुप्तावस्थेतच होता. हा ग्रंथ मिळाला कसा, याचीही मजेदार गोष्ट आहे -

राष्ट्रकुटांच्या काळात कोण्या मल्लिकब्बेजी या बाईने या ग्रंथाची एक प्रत नकलून घेतली आणि आपले गुरू माघनंदिनीजी यांना शास्त्रदान केली. या ग्रंथाची प्रत हस्ते-परहस्ते सुप्रसिध्द आयुर्वेद चिकित्सक धरणेन्द्र पंडितांच्या घरी पोहोचली. हे धरणेन्द्र पंडित बंगळूर-तुमकुर लोहमार्गावरील दोड्डबेले नावाच्या लहानशा गावात रहायचे. या ग्रंथाबद्दल त्यांना फारशी माहिती नसली, तरी याचं महत्त्व ते जाणून होते. म्हणूनच आपले मित्र चंदा पंडितांबरोबर ते 'सिरी भूवलय' या ग्रंथावर कन्नड भाषेत व्याख्यानं द्यायचे.

या व्याख्यानांमुळे बंगळूरच्या 'येल्लप्पाशास्त्री' ह्या तरुण आयुर्वेदाचार्याला, हा ग्रंथ धरणेन्द्रशास्त्रींकडे आहे हे समजले. या ग्रंथासंबंधी येल्लप्पाशास्त्रींनी बरेच काही ऐकले होते. तेव्हा हा ग्रंथ मिळवायचाच, हा निश्चय पक्का होता. मग काहीही करून ह्या ग्रंथाचे हस्तलिखित मिळविण्यासाठी येल्लप्पाशास्त्रींनी, दोड्डबेलाला जाऊन धरणेन्द्रशास्त्रींच्या पुतणीशी विवाह केला.

पुढे १९१३ मधे धरणेन्द्रशास्त्रींचे निधन झाले. पूर्ण वेळ विद्याभ्यासात दिल्याने त्यांच्या घराची आर्थिक स्थिती फारच दयनीय झालेली होती. म्हणून त्यांच्या मुलाने धरणेन्द्र शास्त्रींच्या काही वस्तू विकावयास काढल्या. त्यात 'सिरी भूवलय' हा ग्रंथही होता. अर्थातच येल्लप्पाशास्त्रींनी हा ग्रंथ आनंदाने विकत घेतला. त्यासाठी त्यांना बायकोचे दागिने विकावे लागले. मात्र ग्रंथ हातात आल्यावरही शास्त्रींना त्याची उकल करता येत नव्हती. १२७० पानांच्या ह्या हस्तलिखितात सारेच अगम्य होते. पुढे १९२७ ला प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी करमंगलम श्रीकंठय्याजी बंगळुरात आले. त्यांच्या मदतीने ह्या ग्रंथाची किवाडं काहीशी किलकिली झाली.

या हस्तलिखितातील माहितीच्या आधारे प्रयत्न करत-करत, त्यातील सांकेतिक माहितीची फोड करायला तब्बल ४० वर्षे जावी लागली. सन १९५३ मधे कन्नड साहित्य परिषदेनं ह्या ग्रंथाचं पहिल्यांदा प्रकाशन केलं. ग्रंथाचे संपादक होते - येल्लप्पाशास्त्री, करमंगलम श्रीकंठय्या आणि अनंत सुब्बाराव. यातील अनंत सुब्बाराव हे तंत्रज्ञ होते. त्यांनीच पहिला कन्नड टाईपरायटर तयार केला होता.

असं काय महत्त्वाचं होतं ह्या ग्रंथात, ज्यासाठी लोकं आपलं अख्खं आयुष्य वेचायला तयार होते..?

हा ग्रंथ इतर ग्रंथांसारखा एखाद्या लिपीत लिहिलेला नाही तर हा अंकांमध्ये लिहिलेला आहे. हे अंकही १ ते ६४ मधील आहेत. हे अंक किंवा आकडे विशिष्ट पद्धतीने वाचले की, एखाद्या विशिष्ट भाषेत, विशिष्ट ग्रंथ वाचता येतो. ग्रंथकर्त्याच्या अर्थात मुनी कुमुदेन्दूंच्या मते, हा ग्रंथ १८ लिप्या आणि ७१८ भाषांमध्ये वाचता येतो.

हा ग्रंथ म्हणजे अक्षरशः विश्वकोश आहे. ह्या एका ग्रंथात अनेक ग्रंथ दडलेले आहेत. रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे, अनेक जैन ग्रंथ या एका ग्रंथात सामावलेले आहेत. गणित, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, इतिहास, वैद्यक, तत्त्वज्ञान यांसारख्या अनेक विषयांवरील ग्रंथही या एकाच ग्रंथात वाचता येतात.

या ग्रंथाची १६,००० पाने होती, असा ग्रंथातच कुठे उल्लेख आहे. त्यातील फक्त १२७० पानेच सध्या उपलब्ध आहेत. एकूण ५६ अध्याय असलेल्या ह्या ग्रंथाच्या फक्त तीन अध्यायांचीच उकल करणे सध्या शक्य झाले आहे. १८ लिप्या आणि ७१८ भाषांपैकी सध्या कन्नड, तमिळ, तेलुगू, संस्कृत, मराठी, प्राकृत इत्यादी भाषांमधूनच हा ग्रंथ वाचता येतो. एखाद्या संगणकीय विश्वकोशासारखे या ग्रंथाचे स्वरूप आहे. ह्या ग्रंथाची संपूर्ण संहिता जेंव्हा उलगडली जाईल, तेव्हा त्याची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट होऊ शकतील.

हा ग्रंथ लिपीत नसून आकड्यांत आहे, हे आपण बघितलंच. त्यातही फक्त १ ते ६४ अंकांचाच वापर केलेला

आहे. आता कुमुदेंदू मुनींनी फक्त ६४ पर्यंतच आकडे कां घेतले..? तर ६४ हे ध्वनींचे संकेत आहेत, ज्यात ऱ्हस्व, दीर्घ आणि लुप्त मिळून २५ स्वर; क, च, न, प सारखे २५ वर्गीय वर्ण; य, र, ल, व सारखी अवर्गीय व्यंजने इत्यादी मिळून ६४ ही संख्या होते.

या संख्यांना २७ × २७ च्या चौकोनांमध्ये मांडले जाते. आता हे जे ७२९ अंक चौकोनांमध्ये येतात, त्यांना ग्रंथात दिलेल्या निर्देशांनुसार खालून-वर, वरून-खाली, उभे-आडवे वगैरे करून लिहिले आणि त्यांना त्या भाषेच्या वर्णक्रमानुसार मांडले (उदा - ४ हा अंक असेल तर मराठीतील वर्ण 'घ' येईल. क, ख, ग, घ.. प्रमाणे), तर छंदोबद्ध काव्य अथवा धर्म, दर्शन, कला.. वगैरे प्रकारचा ग्रंथ तयार होतो..!

काय अफाट आहे हे! आणि किती अद्भुत..! आपण आपल्या 'सुडोकू'चा लहानसा चौकोन तयार करायला संगणकाची मदत घेतो अन् इथे हजार बाराशे वर्षांपूर्वी एक जैन मुनी आपल्या कुशाग्र आणि अद्भुत बुद्धीचा परिचय देऊन फक्त अंकांमधून विश्वकोश तयार करतात..!

सारंच अतर्क्य..!!

या ग्रंथाचं प्रत्येक पान म्हणजे २७ × २७ असा ७२९ अंकांचा भला मोठा चौकोन आहे. या चौकोनांना चक्रं म्हणतात. अशी १२७० चक्रं सध्या उपलब्ध आहेत. या चक्रांमध्ये ५६ अध्याय आहेत आणि एकूण श्लोकांची संख्या सहा लाखांच्या वर आहे. या ग्रंथाचे एकूण ९ खंड आहेत. उपलब्ध असलेले १२७० चक्र हे पहिल्या खंडातीलच आहेत, ज्याचं नाव आहे- 'मंगला प्रभृता'. एक प्रकारे हा खंड म्हणजे इतर ८ खंडांची फक्त ओळख आहे. अंकांच्या स्वरूपात यात १४ लाख अक्षरं आहेत. यातून ६ लाख श्लोक तयार होतात.

या प्रत्येक चक्रात काही 'बंध' आहेत. बंध म्हणजे अंकांना वाचण्याची पद्धत किंवा एका चक्राच्या आत अंक मांडण्याची पद्धत. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर- 'बंध' म्हणजे तो श्लोक किंवा तो ग्रंथ वाचण्याची किल्ली (किंवा पासवर्ड) आहे. या बंधामुळे आपल्याला त्या चक्रातील ७२९ अंकांमधला पॅटर्न कळतो आणि मग त्या-त्या भाषेप्रमाणे तो ग्रंथ उलगडू लागतो. या बंधाचे वेगवेगळे प्रकार आहेत. जसे चक्र-बंध, नवमांक-बंध, विमलांक-बंध, हंस-बंध, सारस-बंध, श्रेणी-बंध, मयूर-बंध, चित्र-बंध इत्यादी.

गेल्या अनेक वर्षांपासून ह्या भूवलय ग्रंथाला 'डी-कोड' करण्याचे काम चालू आहे. अनेक जैन संस्थांनी हां ग्रंथ प्रकल्प म्हणून स्वीकारला आहे. इंदूरला जैन साहित्याच्या संशोधनाचं 'कुन्दकुंद ज्ञानपीठ' उभं राहिलंय, जिथे डॉ. महेंद्रकुमार जैन यांनी या विषयावर बरेच काम केले आहे. आय. टी. क्षेत्रातल्या काही जैन तरुणांनी या विषयावरील वेबसाईट तर चालू केलीच आहे, पण संगणकाची मदत घेऊन या ग्रंथाला 'डी-कोड' करण्याचं काम केलं जातंय. अगदी लहान प्रमाणात त्याला यशही आलंय.

मात्र तरीही आज एकविसाव्या शतकाचं सतरावं वर्ष संपत असतानाही, जगभरातले अनेक जैन विद्वान या ग्रंथावर काम करत असतानाही, प्रगत संगणकप्रणालीचे अल्गोरिदम वापरूनही ह्या ग्रंथाची उकल झालेली नाही.! ५६ पैकी फक्त तीनच अध्याय 'डी-कोड' होऊ शकले आहेत.

मग हजार-बाराशे वर्षांपूर्वी आजच्यासारखी कसलीही साधनं हाताशी नसताना, मुनी कुमुदेन्दूंनी इतका क्लिष्ट ग्रंथ कसा रचला असेल.? बरं, मुनिवर्य कन्नड भाषक होते. मग त्यांना इतर भाषांचे असे अवजड अल्गोरिदम्स तयार करणं कसं जमलं असेल..?

आणि मुळात इतकी कुशाग्र आणि अफाट बुद्धिमत्ता त्यांच्याजवळ कुठून आली असेल..?

इंडॉलॉजी'च्या क्षेत्रातलं भारतातलं आदरानं घेतलं जाणारं नाव आहे श्री. एस. श्रीकांत शास्त्रींचं (१९०४ - १९७४). त्यांनी 'भूवलय' ह्या ग्रंथाबद्दल लिहून ठेवलंय- हा ग्रंथ कन्नड भाषा, कन्नड साहित्य, तसेच संस्कृत, प्राकृत, तमिळ, तेलुगू साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. हा ग्रंथ भारताच्या आणि कर्नाटकच्या इतिहासावर प्रकाश टाकतो. भारतीय गणिताच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ म्हणजे महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवन विज्ञानाच्या विकासाच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. तसेच तो शिल्पे आणि प्रतिमा प्रतीके यांच्या अभ्यासासाठीदेखिल उपयुक्त आहे. यातील रामायण, महाभारत, भगवद् गीता, ऋग्वेद व इतर ग्रंथांची फोड करता आली; तर त्यांची आणि सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथांची तुलना अभ्यासाच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल. नष्ट झालेले अनेक जैन ग्रंथ सिरी भूवलयमध्ये सापडू शकतात.

ह्या ग्रंथाची माहिती जेव्हा आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांना मिळाली, तेव्हा त्यांचे उत्स्फूर्त उद्गार होते 'हा श्री भूवलय ग्रंथ म्हणजे जगातलं आठवं आश्चर्य आहे..!'

एका अर्थानं हे खरंय; कारण जगाच्या पाठीवर कुठेही असा 'एकात अनेक ग्रंथ' असलेला, कूट पद्धतीनं लिहिलेला विश्वकोश आढळत नाही.

आपलं दुर्दैव इतकंच की, भारतीय ज्ञानाचा हा अमोल खजिना आपल्याला तरी कुठे माहीत होता..?

संकलन

- प्रशांत पोळ

'...अन् स्वप्न साकारलं!'

माझ्या मनात अगदी माझ्या लहानपणापासून- का कोण जाणे, पाकिस्तान आणि चीन या दोन देशांच्या नावाबद्दल कमालीचे कुतूहल होते. वाढत्या वयाबरोबर आणि शिक्षणामुळे कमीत कमी एक तरी देशाला भेट देण्याची अर्थात पर्यटक म्हणून किंवा फार तर त्यांच्या सीमेवरून तो देश बघण्याचे स्वप्न मनाच्या कोपऱ्यात स्थान करून होते. पण काही ना काही कारणामुळे आयुष्याचे त्रेसष्ट उन्हाळे-पावसाळे निघून गेले, पण योग काही येत नव्हता. शेवटी २०१२ मध्ये हा योग अचानक आला. पाकिस्तान देशात जाणे नाही जमले; पण सीमेवर जाऊन येण्याची संधी मिळाली व तिचा मी पुरेपूर फायदा घेतला.

वाघा बॉर्डर अमृतसरपासून साधारण ४० किमी अंतरावर आहे. भारत-पाकिस्तान सीमेवर वाघा बॉर्डर येथे संध्याकाळी होणारी परेड फार प्रसिद्ध आहे. आम्ही अमृतसरला सकाळी सुवर्णमंदिर, जालियनवाला बाग अशा महत्त्वपूर्ण स्थळांना भेटी दिल्या व नंतर वाघा बॉर्डरकडे कूच केले. संध्याकाळी पाच वाजता ती परेड सुरू होते. अगदी पुढे बसून मला ती पाहावयाची होती, म्हणूनच लवकरच पोहोचलो. गर्दी तर आधीपासूनच होती. रांगेत लागून सिक्युरिटी चेक इत्यादी सोपस्कार आटोपून मुख्य स्टेडियमला जिथे ही परेड होते, तिथे पोहोचलो. नशिबाने जागा योग्य ठिकाणी उपलब्ध होती. घड्याळाचा काटा अगदी संथगतीने पुढे सरकत होता. अमृतसरच्या आसपास सर्वदूर अगदी कडक उन होते. स्टेडियमच्या पायऱ्यादेखील खूप तापलेल्या होत्या. सोबत आणलेली पाण्याची बाटली पण लवकरच संपली. अगदी बसवत नव्हते त्या गर्दीत आणि गर्मीत. पण एक मोठे स्वप्न साकार होणार होते ना!

बघता-बघता संपूर्ण स्टेडियम लोकांनी खच्चून भरले. हाकेच्या अंतरावर भारताचे गेट होते अन् पलीकडे पाकिस्तान. अक्षरश: एक-एक क्षण मोजत होतो. अन् एकदाचे पाच वाजले! उपस्थित लोकांना माईकवरून सूचना दिल्या जात होत्या अन् मधूनमधून देशभक्तिपर गीते लावली जात होती. उपस्थितांमध्ये जणू देशभक्तीचे स्फुरण चढले होते. 'मेरा रंग

दे बसंती चोला' हे गाणे लावल्यावर उपस्थित प्रेक्षकांनी प्रचंड जल्लोष केला. त्यानंतर 'सुनो गौरसे दुनियावालो सबसे आगे होंगे हिंदुस्थानी' या गीताला ऐकताना तर अंगावर शहारे येत होते. तेवढ्यात प्रेक्षकांमधील काही महिला व मुलांना स्टेडियममधील मोकळ्या जागेत नाच करण्याची परमिशन मिळाली. बघता बघता बरेच लोक नाच करू लागले. मी पण हळूच त्यांच्यामध्ये सामील झालो. त्या नाचात एक वेगळाच जोश होता. उल्हास होता. देशाविषयीचा अभिमान होता आणि स्वातंत्र्याचे सुख होते. पाकिस्तानच्या सीमेत पण तितक्याच उत्साहात असे सर्व सुरू होते. सगळे जणू स्वप्नवतच वाटत होते. कोण, कुठले, कुठल्या प्रांतातले, कुठल्या गावचे सगळे अगदी एकरूप होऊन नाचून आनंद व्यक्त करत होते. आपल्या देशाच्या सैनिकांनी नाचणाऱ्या काही जणांच्या हातात भारतीय ध्वज देऊन तो घेऊन सीमेवर असणाऱ्या गेटपर्यंत धावत जाण्याची परवानगी दिली. मीही त्यातला एक होतो, ध्वज हातात घेऊन गेटकडे धावणारा. देवाशप्पथ.... काय अभिमान वाटला सांगता येत नाही शब्दांत!

वाटलं, किती स्वातंत्र्य आहे आपल्याला! कुणाचेही बंधन नाही. थोड्यावेळाने सर्वांना जागेवर बसवून सैनिकांची परेड सुरू झाली. परेड बघताना सैनिकांच्या चालण्यातली ऐट बघितली अन् मनात आलं की- ह्या जिगरबाज सैनिकांना गेट ओलांडून सीमेपलीकडे जाण्याची परवानगी दिली, तर पाकिस्तानमध्ये घुसून एकेका शत्रूचा खात्मा करून येतील. बी. एस. एफ.च्या जवानांचे संचालन 'भारत माता की जय' 'वंदे मातरम्' म्हणत सुरू होते. उपस्थित लोक पण त्यांना जल्लोष करून साथ देत होते. अशा देशभक्तिपर वातावरणात सर्व जण अगदी भारावून गेले होते. देशाबद्दल अभिमानाची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली होती. त्याचे वर्णन केवळ शब्दातीत आहे.

फोटो तर अनेक काढले; पण तिथला प्रत्यक्ष अनुभव हा कुठल्याही फोटोची बरोबरी करू शकणार नाही किंवा त्याला न्याय देऊ शकणार नाही. सर्वांच्या अंगावर जणू रोमांच फुलत होते. कार्यक्रम दोन तासांचा असला तरी अवर्णनीय आहे, स्वप्नवत् आहे. आपली अनेक स्वप्नं ही स्वप्नच होऊन राहतात; पण आयुष्यात एकदा तरी भारत-पाकिस्तान सीमेवरील वाघा बॉर्डर येथे संध्याकाळची परेड पाहून आलात, तर मी म्हणेन ...अन् स्वप्न साकार झाले!

श्री. श्रीपाद टेंबे
भ्रमणध्वनी : ९१५८०८८०४२

प्रमाणामधे सर्व काही असावे- रामदास स्वामी



समर्थ रामदासस्वामींची अतिशय सुंदर रचना.

ही २० कडवी म्हणजे २० रत्ने आहेत.

अतीकोपता कार्य जाते लयाला,
अती नम्रता पात्र होते भयाला ।
अती काम ते कोणतेही नसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १ ।।

अती लोभ आणि जना नित्य लाज,
अती त्याग तो रोकडा मृत्यु आज ।
सदा तृप्त नेमस्त सर्वां दिसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। २ ।।

अती मोह हा दुःख शोकास मूळ,
अती काळजी टाकणे हेही खूळ ।
सदा चित्त हे सद्विचारे कसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ३ ।।

अती ज्ञान अभ्यासल्या क्षीण काया,
अती खेळणे हा भिकेचाच पाया ।
न कष्टाविणे त्वा रिकामे बसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ४ ।।

अती दान तेही प्रपंचात छिद्र,
अती हीन कार्पण्य मोठे दरिद्र ।
बरे कोणते ते मनाला पुसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ५ ।।

अती भोजने रोग येतो घराला,
उपासे अती कष्ट होती नराला ।
फुका सांग देवावरी का रुसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ६ ।।

अती स्नेह तेथे अवज्ञा उदंड,
अती द्वेष भूलोकीचे पंककुंड ।
अती मत्सरे त्वां कशाला कुसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ७ ।।

अती आळशी वाचुनी प्रेतरूप,
अती झोप घे तोही त्याचाच भूप ।
सदा सत्कृतीमाजी आत्मा विसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ८ ।।

अती द्रव्यही जोडते पापरास,
अती घोर दारिद्र्य तो पंकवास ।
धने वैभवे त्वां न केव्हा फसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ९ ।।

अती भाषणे वीटती बुद्धिवंत,
अती मौन मूर्खत्व ते मूर्तिमंत ।
खरे तत्त्व ते अल्पशब्दे ठसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १० ।।

अती वाद घेता दुरावेल सत्य,
अती 'हो' स 'हो' बोलणे नीचकृत्य ।
विचारे तुवा ज्ञानमार्गी घुसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। ११ ।।

अती औषधे वाढवितात रोग,
उपेक्षा अती आणते सर्व भोग ।
हिताच्या उपायास का आळसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १२ ।।

अती दाट वस्तीत नाना उपाधी,
अती शून्य रानात औदास्य बाधी ।
लघुग्राम पाहून तेथे वसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १३ ।।

अती शोक तो देतसे दुःखवृद्धी,
अती मानतो हर्ष तो क्षुद्रबुद्धी ।
ललाटाक्षरां सांग कोणी पुसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १४ ।।

अती भूषणे मार्ग तो संकटाचा,
अती थाट तो वेष होतो नटाचा ।
रहावे असे की न कोणी हसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १५ ।।

स्तुतीला अती बोलती श्वानवृत्ती,
अती लोकनिंदा करी दुष्ट चित्ती ।
न कोणा उगे शब्दस्पर्शे डसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १६ ।।

अती भांडणे नाश तो यादवांचा,
हठाने अती वंश ना कौरवांचा ।
कराया अती हे न कोणी वसावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १७ ।।

अती गोड खाणे नसे रोज इष्ट,
कदन्ने अती सेवणे हे कनिष्ठ ।
असोनी गहू व्यर्थ खावे न सावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १८ ।।

जुन्याचे अती भक्त ते हट्टवादी,
नव्याचे अती लाडके शुद्ध नादी ।
खरे सार शोधोनिया नित्य घ्यावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।। १९ ।।

सदा पद्य घोकोनियां शीण येतो,
सदा गद्य वाचोनियां त्रास होतो ।
कधी ते कधी हेही वाचीत जावे,
प्रमाणामधे सर्व काही असावे ।।२०।।

—समर्थ रामदासस्वामी

दि. १९ नोव्हेंबर 'गौरवदिना' च्या निमित्ताने

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने मागील वर्षी आवाहन केल्याप्रमाणे झाशी राणी लक्ष्मीबाई ह्यांचा जन्मदिवस १९ नोव्हेंबर हा 'गौरवदिन' म्हणून साजरा करण्याचे सर्व क. ब्रा. संघांना कळविले होते. त्याप्रमाणे बऱ्याच क. ब्रा. संघांनी तो उत्तमरीतीने साजरा करून आम्हाला त्यांचा सविस्तर वृत्तांत पाठविला होता. या आधीच्या अंकातून आम्ही त्याला योग्य प्रसिद्धी दिली होती.

ह्या वर्षीसुद्धा १९ नोव्हेंबरचे योग्य ते नियोजन करून झाशी राणी

लक्ष्मीबाईचा हा जन्मदिवस 'गौरवदिन' म्हणून साजरा करावा असे सर्व संघांना आम्ही आवाहन करतो. ह्या १९ नोव्हेंबर 'गौरव दिना'च्या निमित्ताने झाशी राणी लक्ष्मीबाईचा, 'जीवनपट' खाली वर्णन केलेला आहे. त्यापासून केवळ युवा पिढीलाच नव्हे, तर सर्वांनाच प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा आहे.

लक्ष्मीबाई गंगाधरराव नेवाळकर, म्हणजेच झाशीची राणी लक्ष्मीबाई (नोव्हेंबर १९, इ.स. १८३५ - जून १८, इ.स. १८५८) या एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या राणी होत्या. हिंदुस्थानात इ.स. १८५७च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध झालेल्या स्वातंत्र्य-उठावातील या एक अग्रणी सेनानी होत्या. यांच्या शौर्याने यांना 'क्रांतिकारकांची स्फूर्तिदेवता' म्हणून जनमानसात अढळ स्थान प्राप्त झाले.

बालपण

लक्ष्मीबाईंचे मूळ नाव मनकर्णिका तांबे होते. यांचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. तांबे कुटुंब मूळचे सातारा जिल्ह्यातील होते. लक्ष्मीबाईंचा जन्म भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी येथे झाला होता.

व्यक्तिमत्त्व

धोरणी, चतुर, युद्धशास्त्रनिपुण, शूर आणि थोर कर्तृत्व व नेतृत्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाई जन्मतः कोणत्याही राजघराण्यातील नसल्या, तरी राजघराण्याशी संबंधित व्यक्तींमधे वावरलेल्या वाढलेल्या होत्या. अश्वपरीक्षेचे- सर्व मापदंड माहीत असणाऱ्या लक्ष्मीबाई घोडेस्वारी करण्यातही वाकबगार होत्या. त्या काळी पूर्ण हिंदुस्थानात श्रीमंत नानासाहेब पेशवे, जयाजी शिंदे व लक्ष्मीबाई या तिघांशिवाय अचूक अश्वपरीक्षा करणारा कोणीही नव्हता. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंनी युद्धशास्त्रातील प्रत्येक विद्येत प्रावीण्य मिळविले.

बाजीरावांच्या पदरी बाळंभट देवधर नावाचे उत्तम कसरतपटू आणि कुस्तीगीर होते. त्यांनीच मल्लविद्येत पारंगत होण्यासाठी मल्लखांब नावाचा कसरतीचा वेगळा प्रकार शोधून काढला. मनाची एकाग्रता, विलक्षण चपळता, शरीराचा तोल सांभाळण्याचे पूर्ण कौशल्य, काटकपणा आणि चतुरस्र भान वृद्धिंगत करणाऱ्या मल्लखांबविद्येतही राणी लक्ष्मीबाई तरबेज झाल्या.

लक्ष्मीबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती असणाऱ्या समाजाने एका विधवा राणीला दुर्लक्षित करू नये, म्हणून त्यांनी धोरणीपणाने पुरुषी पोषाखात वावरण्याचे ठरवले.

वैवाहिक जीवन

इ.स. १८४२ मध्ये त्यांचा विवाह झाशी संस्थानाचे राजे गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला, तेव्हा त्यांचे नाव बदलून लक्ष्मीबाई असे ठेवण्यात आले. लग्नानंतर झाशीच्या प्रजाजनांत राणीबद्दल विशेष प्रेम निर्माण झाले. दरबाराचे कामकाज राणीने पाहणे गंगाधररावांस पसंत नसल्याने मिळालेल्या वेळेचा उपयोग लक्ष्मीबाईंनी स्वत्व जपण्यासाठी केला. त्यांनी आपला रोजचा व्यायाम, कसरत, घोडेस्वारी, तलवारबाजी नियमित सुरू ठेवली.

गंगाधरराव नेवाळकर व लक्ष्मीबाई यांना मुलगा झाला, परंतु तीन महिन्यांचा असताना तो मृत्यू पावला. मुलाच्या रूपाने वारस मिळाल्याच्या आनंदात असणारे गंगाधररावही या गोष्टीने दुःखी झाले. त्यांनी वासुदेवराव नेवाळकर यांच्या मुलाला दत्तक घेऊन त्याचे दामोदर असे नाव ठेवले. इ.स. १८५३ मध्ये गंगाधररावांचे निधन झाले.

झाशी संस्थान खालसा

पूर्वीपासून झाशीच्या ब्रिटिशांशी असणाऱ्या मैत्रीपूर्ण संबंधांवरून राणी लक्ष्मीबाईंना ईस्ट इंडिया कंपनीद्वारे ब्रिटिश सरकार झाशी संस्थान खालसा करणार नाही, असे वाटत होते. त्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीशी लक्ष्मीबाई स्वतः पत्रव्यवहार करत होत्या. या पत्रव्यवहारातून त्यांनी

कंपनी सरकारचा अन्याय, बेकायदेशीरपणा आणि खोडसाळपणा उघड केला. एका पत्रात त्यांनी 'झाशी संस्थान' खालसा केले, तर पूर्ण हिंदुस्थानातील लोकांना हळहळ वाटेल, परिणामी हिंदुस्थानातील लोकांना ब्रिटिशांबद्दल भरवसा, विश्वास वाटेल का?', अशी शंका व्यक्त करून कंपनीला एक प्रकारचे आव्हान दिले. कंपनी सरकारच्या बेजबाबदार अनैतिक कृत्यांना व कंपनीच्या अधिकाराला आव्हान देण्याचे धारिष्ट्य करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या देशातील पहिल्या काही व्यक्तींमधील एक होत्या.

परंतु, हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करण्याचा निर्णय गव्हर्नर जनरल डलहौसीने घेतलेलाच असल्याने झाशी संस्थानही खालसा करण्यात आले. दि. १३ मार्च १८५४ रोजी झाशीच्या जनतेला उद्देशून जाहीरनामा काढण्यात आला. त्यानुसार दत्तकविधान नामंजूर करून झांशी संस्थान ब्रिटिश सरकारात विलीन करण्यात आले. त्या वेळीच स्वाभिमानी राणीने 'माझी झाशी देणार नाही' असे स्फूर्तिदायक उद्‌गार काढले.

झाशी खालसा झाल्यावर लक्ष्मीबाईंना किल्ला सोडून शहरातील राजवाड्यात राहायला यावे लागले. राणी लक्ष्मीबाईंना पदच्युत झाल्याचा अपमान सहन करीत काही काळ शांत बसावे लागले होते.

इ.स. १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध

इ.स. १८५७ चा उठाव हा पूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याप्रमाणे ५ जून, १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला. केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून लावले. या परिस्थितीत इंग्रजांच्या परवानगीची वाट न पाहता राणी लक्ष्मीबाई किल्ल्यावर राहण्यास गेल्या. पुढे २२ जुलै १८५७ ला ब्रिटिशांनी राणींना झाशीची अधिकारसूत्रे हाती घेण्यास सांगितले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या, परंतु अतिशय बिकट परिस्थितीत त्यांच्या हाती राज्यकारभार आला होता. मनुष्यबळ नव्हते आणि खजिनाही रिकामाच होता. प्रजेच्या मनात व असुरक्षितता, भविष्याबद्दल भीती होती, परंतु तरीही लक्ष्मीबाईंनी खंबीरपणाने परिस्थिती हाताळली, जुन्या विश्वासातील लोकांना परत बोलावून त्यांना अधिकाराची काही पदे दिली. दिवाण लक्ष्मणरावांना प्रधानमंत्री, तर प्रत्यक्ष वडिलांना- मोरोपंत तांब्यांना- खजिनदार केले. लक्ष्मणरावांचा भाऊ, मुलगा तसेच मुन्सफ, भोलानाथ, आणि नामांकित गोलंदाज खुदाबक्ष यांना फौजेचे व शस्त्रास्त्रांच्या जोडणीचे काम दिले. बंडखोर ठाकूरांना धोरणीपणाने आपल्या बाजूस वळविले. राज्याच्या सल्लागार मंडळात सामील करून घेतले. ब्रिटिशांनी निकामी केलेल्या २२ तोफा पुन्हा सुरू करून तोफगोळ्यांची निर्मितीही सुरू केली. इंग्रजांविरुद्ध बंड करणाऱ्या विद्रोही शिपायांना आपल्या सैन्यात सामील करून घेतले. परकीयांविरुद्ध लढण्याची तयारी करीत असतानाच राणीने प्रजेचा स्वाभिमान, निष्ठा वाढवण्याचा व आनंद जपण्याचा प्रयत्न केला. दानशूर, श्रद्धाळू व दयाळू लक्ष्मीबाईंनी थंडीत कुडकुडणाऱ्या हजार-दीड हजार गरिबांना, साधू-संन्याशांना उबदार कपड्यांचे वाटप केले. स्वतःबरोबर प्रजेच्या श्रद्धा जपणाऱ्या राणीने गोवधबंदी सुरू केली. रंगपंचमीसारखा सण साजरा करून स्त्रियांसाठी हळदी-कुंकवासारखे धार्मिक कार्यक्रम त्यांनी किल्ल्यावर केले.

अशा प्रकारे प्रशासन, सैन्य व कल्याणकारी कामे यांची चोख व्यवस्था लावून स्वराज्य असल्याचा विश्वास राणी लक्ष्मीबाईंनी जनतेत निर्माण केला. प्रजेला मुक्त मनाने आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यासाठी, त्यांच्या कलेची जोपासना करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी झाशीमध्ये मराठी नाटकांचे प्रयोग घडवून आणले. मराठी भाषकांसाठी रासक्रीडा, चित्रलेखा, बाणासुर इ. नाटके योजली. स्वतःही नाटकांचा आनंद घेतला. एक स्थिर, सुरक्षित, समृद्ध व सुसंस्कृत राज्य घडवण्याचा प्रयत्न राणी लक्ष्मीबाईंनी केला. यामुळे राणी आणि झाशीतील प्रजा यांच्यातील नाते दृढ झाले.

दरम्यान २१ मार्च १८५८ ला सकाळीच सर ह्यू रोज आपल्या फौजेसह झाशीजवळ आला. त्याने राणीला निःशस्त्र भेटीस यावे किंवा युद्धास तयार राहावे, असे कळविले. ब्रिटिशांनी केलेल्या विश्वासघातामुळे, अन्यायामुळे 'भारतात विदेशी शासन नकोच' अशा ठाम मताच्या राणीने भेटीस जाण्याचे नाकारले. त्याच वेळी तात्या टोपे यांच्याशी संधान बांधून एका बाजूने इंग्रजांवर हल्ला करण्यास सुचविले.

उत्तम प्रतीचा सेनानी आणि कर्तबगार राजकारणी असणाऱ्या ह्यू रोजने झाशीच्या किल्ल्यावर मारा करण्यासाठी आजूबाजूच्या टेकड्यांवर कब्जा मिळविला. त्या टेकड्यांवर तोफा चढवल्या. दिवस झाशीची बाजू २-३ अभेद्य होती. घनगर्ज भवानीशंकर, कडक बिजली या तोफा आपल्या नावाप्रमाणे कार्यरत होत्या. घौसखान याने तर तोफेमधून असा मारा केला की, त्यामुळे दोन शिवमंदिरे वाचली. या गोष्टीसाठी आजही झाशीतील लोक त्याला धन्यवाद देतात. युद्धाच्या नवव्या दिवशी इंग्रजांनी पश्चिमेकडील तोफ बंद पाडून त्या बाजूच्या तटाला खिंडारे पाडली. ही खिंडारे बुजवण्यासाठी रातोरात काम केले गेले. त्या वेळी चुना, दगड,

विटा यांची ने-आण करण्याचे काम स्त्रियांनी केले होते, हे विशेष.

शेवटी ब्रिटिशांना फितुरांनीच साथ दिली. झाशीमधील शंकर किल्ल्यावरील मोठ्या विहिरीतून संपूर्ण झाशीला पाणी पुरवठा व्हायचा ती विहीर आणि जिथे दारूगोळा तयार व्हायचा तो कारखाना ही दोन ठिकाणे इंग्रजांनी उद्ध्वस्त केली. अशा स्थितीत राणीची आशा पेशव्यांकडून येणाऱ्या मदतीवर होती. त्याप्रमाणे ३१ मार्चला तात्या टोपेंचे सैन्य आले, परंतु इंग्रजांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

राणी लक्ष्मीबाईंनी सर्व फौजेला धीर देताना स्वतःच्या बळावरच लढण्याचे आवाहन केले. एवढेच नाही, तर 'रणांगणात तुम्हाला मृत्यू आला, तर तुमच्या विधवांच्या निर्वाहाची व्यवस्था मी करेन' असे आश्वासन दिले. राणीचे डावे-उजवे हात असणारे खुदाबक्ष आणि घौसखान इंग्रजांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडल्यावर मात्र बिकट परिस्थिती निर्माण झाली. ब्रिटिश सैन्य शिड्या लावून शहरात उतरले. शांत, सुंदर शहराची होणारी वाताहत पाहून राणी संतापली आणि त्यांनी प्रत्यक्ष रणांगणात उतरण्याचा निर्णय अंमलात आणला. संतापलेल्या राणीची तलवार अशी तळपत होती की, समोर येणारा गोरा शिपाई गारदच होत होता. त्यांचे धैर्य, शौर्य, आवेश पाहून ह्यू रोजही थबकला. तरीही एका अनुभवी सरदाराने पुढचा धोका लक्षात घेऊन लक्ष्मीबाईंना किल्ल्यावर परत नेले. सर्व फौजी अधिकाऱ्यांशी लक्ष्मीबाईंनी चर्चा केली आणि निर्णयानुसार रातोरात त्यांनी झाशी सोडले. सतत ११ दिवस राणीने ब्रिटिशांना झुलवत ठेवले. लढाईचा साक्षीदार ह्यू रोजनेही म्हटले की, 'राणी लक्ष्मीबाई सर्वोत्कृष्ट सैनिक आणि सर्वाधिक हिंमतवान व्यक्ती होती.'

या पराभवानंतर राणी पेशव्यांबरोबर ग्वाल्हेरला गेली. तेथेही स्वस्थ न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित चालू ठेवली. सैन्यांमध्ये फिरून, सैनिकांची चौकशी करीत, इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चेबांधणी करावी याविषयी त्यांनी चर्चा केली. याच वेळी १७ जून १८५८ रोजी सकाळीच ब्रिटिश अधिकारी स्मिथ आपल्या सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ येऊन पोहोचला. त्याने त्वरित हल्ला चढवला. लक्ष्मीबाईंनी रणांगणात धाव घेतली. लक्ष्मीबाई तलवारीचे सपासप वार करीत समोर येणाऱ्या ब्रिटिश सैन्याला कापून काढत होत्या. आवेगाने, विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांचे सैन्यही त्वेषाने लढले. इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणारच होते, त्याच वेळी नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली. दोन्हीकडून आलेल्या सैन्यासमोर राणीचा निभाव लागला नाही. परिस्थिती ओळखून त्या काही स्वारांनिशी बाहेर पडल्या. थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा घोडा अडला. नेहमीचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. घोडा काही केल्या ओढा ओलांडत नव्हता. तिथे इंग्रजांशी लढत असताना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या. त्यांचा डाव्या कुशीतही तलवार घुसली, परंतु पुरुषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत. ते पुढे निघून गेले. घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना त्यांच्या सेवकाने एका मठात आणले, परंतु त्यांची उपचार करून घेण्याची इच्छा नव्हती. आपला देह क्रूर इंग्रजांच्या हाती लागू नये, अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्या सेवकाने त्यांना मुखाग्नी दिला. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी मरण स्वीकारले आणि अशा प्रकारे एका शूर राणीला रणांगणात वीरमरण आले.

- संपादक

वात्सल्य

आई दिसतां बाळ हरखले
गोड निरागस हास्य प्रगटले ।
जणू प्राजक्ती फूल उमलले।
आनंदाचा सुगंध दरवळे ।।१।।

मातृस्पर्शा अति आतुरलें ।
हुंकारुनी तिज सादचि घाले ।
हाती पायी धांदल चाले ।
विलंब होता हो रडवेले ।।२।।

बाळालाही पाहून माता ।
चित्ती दाटुनी येई ममता ।
करी उचलुनी झटकन् घेता
कवटाळुनी त्या हृदयीं धरता ।।३।।

मातेला ते बिलगे बालक ।
कोण तयाचे चाले कौतुक ।
निरखी रुपडे धरुनी संमुख ।
भाळी तयाच्या हुंगुनी मस्तक ।।४।।

माझ्या राजा बोल बोलता ।
छकुल्या माझ्या लाडे बघता ।
आवेगाने वदनीं चुंबिता ।
उंच झेलुनी गिरकी घेता ।।५।।

हलवी झुलवी बाळा हाती ।
चिऊकाऊच्या सांगत गमती ।
जिवा शिवांच्या या जणू भेटी
मायलेकरे रंगुन जाती ।।६।।

बाळा घेता फुटतो पान्हा ।
मुखी तयाच्या देऊन स्तना ।
तृप्ती अमृत परस्परांना ।
वात्सल्याची मधुर भावना ।।७।।

-विनायक पां. गुर्जर-पाध्ये
तळेगांव दाभाडे
फोन : ०२११४ २३११४०

विषुववृत्ताची मुशाफिरी

पूर्व आफ्रिकन देशांच्या सफारीदरम्यान तेथील वन्य प्राणी जीवनाबरोबरच आणखी एका वैशिष्ट्याचा परिचय होतो, तो म्हणजे विषुववृत्ताचा.

केनिया अथवा टांझानियामधून फिरताना रस्त्याच्या कडेला अधूनमधून 'इक्वेटर' (विषुववृत्त) असे बोर्ड लावलेले दिसतात. ती म्हणजे पृथ्वीवरील विषुववृत्ताची रेषा होय.

पृथ्वीच्या दक्षिण ध्रुवापासून काल्पनिक रेषा आखली आणि ती उत्तर ध्रुवाला वळसा घालून परत खाली दक्षिण ध्रुवावर आणून पृथ्वीचा उभा परीघ आखला, तर त्याची लांबी ४०००० किलोमीटर होईल.

तर, पृथ्वीच्या गोलाच्या मध्यावरची आडवी काल्पनिक रेषा म्हणजे विषुववृत्ताची लांबी आहे ४०००५ कि.मी.



विषुववृत्त रेषा मुख्यत: हिंदी महासागर, अटलांटिक महासागर अशी समुद्रावरूनच जात असली, तरी जगातील १२ देशांमधूनही ती जाते. त्यात मुख्यत: आफ्रिका खंडातील केनिया, टांझानिया हे देश आहेत. इक्वेडोर या देशाची राजधानी क्विटो ही विषुववृत्तावर आहे.

दक्षिण अमेरिकेतील ब्राझील, कोलंबिया या देशांतून विषुववृत्त जाते. आशियातील इंडोनेशियामधून ते जाते.

केनियामध्ये 'इक्वेटर' असा बोर्ड असलेल्या ठिकाणी स्थानिक रहिवासी पाच-पंचवीस रुपये घेऊन एक शास्त्रीय प्रयोग करून दाखवतात.

एका घमेल्यात पाणी भरून घमेल्यास मध्यभागी एक भोक पाडले जाते. या भोकातून पाण्याची धार काठीसारखी सरळ जमिनीवर येते.

मात्र, विषुववृत्ताच्या रेषेपासून जेमतेम २० मीटर अंतर सोडून उत्तरेला हा प्रयोग केला, तर पाण्याची धार जमिनीवर पडताना उजव्या बाजूने गरगर फिरत पडते.

हाच प्रयोग विरुद्ध दिशेला (विषुववृत्ताच्या दक्षिणेला) २० मीटर अंतर सोडून केला, तर ही धार उलट दिशेने- म्हणजेच डावीकडे गरगर फिरत पडते. हा अचंबित करणारा प्रयोग पाहताना गंमत वाटते.

पाण्याच्या धारेवर विषुववृत्तावर पृथ्वीच्या फिरणाऱ्या वेगाचा जो परिणाम होतो, त्याचे शास्त्रीय नाव 'कोरिऑलिस इफेक्ट' असे आहे. त्याचे कारण शास्त्रीय आहे.

पृथ्वी स्वत:भोवती फिरते. एका दिवसात म्हणजे २४ तासांत ४०००५ कि.मी. परीघ फिरवण्यासाठी विषुववृत्तावर पृथ्वीच्या फिरण्याची गती सर्वांत जास्त असते. ही गती एका तासाला १६७० कि.मी. इतकी वेगवान असते. साहजिकच जमिनीवर पडणाऱ्या पाण्याची धार इतक्या प्रचंड वेगवान गुरुत्वाकर्षणासह खाली पडते.

विषवृत्त रेषेपासून दक्षिणेकडे २० मीटरवर हाच प्रयोग केला तर पाण्याची धार उजवी कडून फिरत डावीकडे खाली पडते, तर उत्तर बाजूला २० मीटर अंतरावर हाच प्रयोग केला तर पाण्याची धार डावी कडून फिरत उजवीकडे खाली पडते.

विषुववृत्ताच्या वरील भागात उत्तर गोलार्धात जे शंख सापडतात, ते सर्व उजव्या कानाचे असतात आणि विषुववृत्ताच्या खालील भागात म्हणजे दक्षिण गोलार्धात जे शंख सापडतात, ते सर्व डाव्या कानाचे असतात.

विषुववृत्ताच्या वरील उत्तर गोलार्धात जे कोळी आहेत, ते सर्व डावीकडून उजवीकडे जाळे विणतात. तर विषुववृत्ताच्या खाली दक्षिण गोलार्धात जे कोळी आहेत, ते सर्व उजवीकडून डावीकडे जाळे विणतात.

आहे ना गंमतीशीर!

संस्थावृत्त

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे

शैक्षणिक उपक्रम : बालक-पालक मेळावा २०१७

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली यांची शिक्षण समिती व डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणीतर्फे आयोजित केलेला बालक-पालक मेळावा दि. २३/७/२०१७ रोजी सायं. ४.३० वा. संस्थेच्या समाजमंदिर सभागृहात संपन्न झाला. हा कार्यक्रम प्रमुख पाहुणे आयुर्वेद वाचस्पती मा. डॉ. श्री. परीक्षित स. शेवडे व वक्ते मा. डॉ. प्रदीप आठवले ह्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. श्री. अरुण अ. नाटेकर, कार्याध्यक्ष मा. श्री. श्रीकांत ग. हर्डीकर, सरकार्यवाह मा. श्री. सुहास म. पंडित यांच्या हस्ते शिक्षण दत्तक योजनेतील ३० लाभार्थी विद्यार्थी /विद्यार्थिनींना मदतीचे वाटप करण्यात आले. इ.१०वी व इ.१२वी मध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व गुणगौरव प्रमुख पाहुणे डॉ. परीक्षित स. शेवडे व डॉ. प्रदीप आठवले यांच्या हस्ते करण्यात आला. वक्ते डॉ. श्री. प्रदीप आठवले यांनी मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे डॉ. श्री. परीक्षित स. शेवडे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय कशी असावी, त्याचप्रमाणे शरीराची काळजी कशी घ्यावी, योगासनांचे फायदे यांचे महत्त्व सांगितले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. उपस्थित असलेल्या सर्वांनी अल्पोहार व चहा-कॉफीचा आस्वाद घेतला.

शिक्षण समिती प्रमुख
सौ. क्षमा सु. धामणकर

कऱ्हाडे ब्राह्मणसंघ, कोल्हापूरतर्फे वार्षिक पारितोषिक वितरण - गुणगौरव समारंभ

ज्येष्ठ सभासद श्री. व सौ. कशाळकर यांचा सत्कार करताना कुलगुरू नितीन करमळकर. शेजारी संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे

रविवार, दि. ३ सप्टेंबर २०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता कऱ्हाडे ब्राह्मण संघ कोल्हापूर यांच्यातर्फे ज्ञातातील ज्येष्ठ व श्रेष्ठांचे सत्कार आणि शैक्षणिक पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. नितीनजी करमळकर आणि सौ. रोहिणीताई करमळकर हे लाभले होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूरच्या अध्यक्षा सौ अनुराधा गुणे यांनी केले. त्यानंतर पौरोहित्यांच्या आशीर्वचनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

यावेळी ज्ञातीतील ज्येष्ठ श्री. म. रा. जावडेकर व सौ. जावडेकर, डॉ. अजित गुणे, डॉ. प्रसाद टेंगशे, सौ. मधुरा टेंगशे, श्री. लक्ष्मण मिराशी, श्री. व सौ. कशाळकर, सौ. वैशाली काकीर्डे आणि विशेष अतिथी रत्नागिरीचे नूतन नगराध्यक्ष श्री. राहुल पंडित यांचे सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. मान्यवरांची ओळख सेक्रेटरी श्री. धर्मराज पंडित यांनी करून दिली.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. नितीनजी करमळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहकोषाध्यक्ष श्री. नितेश जोशी यांनी केले. निरनिराळ्या कला, क्रीडा, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांत पारितोषिकप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थ्यांचे यादीवाचन सहकार्यवाह श्री. अजित कारखानीस यांनी केले. उपाध्यक्ष श्री. मिलिंद पावनगडकर यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमात कोषाध्यक्ष श्री. आनंद खंडकर, कार्यकारिणीतील संचालक श्री. अनिरुद्ध जावडेकर, अर्थ नियोजन समिती सदस्य श्री. रामचंद्र टोपकर, सौ. अश्विनी तांबे, सौ. शारदा लुकतुके, डॉ. प्रकाश गुणे, श्री. अरविंद दीक्षित, डॉ. आनंद ढवळे, श्री. रवींद्र चुनेकर आदी मान्यवर उपस्थित होते. समारंभावेळी उपस्थितांना व विद्यार्थ्यांना पेढे वाटण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

मिलिंद पावनगडकर
प्रतिनिधी, कोल्हापूर

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
सौ. अनुराधा गुणे, कोल्हापूर - मो. ०२३१-२६२७०१४

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई – निवडणूक

रविवार, दि. १३.०८.२०१७ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा क्षत्रिय समाज हॉल, गिरगाव येथे सकाळी १०.३० पासून ते दुपारी २ पर्यंत संपन्न झाली. त्याच वेळी पुढील कालावधीसाठी निवडणूकही झाली. श्री. अजित पंडित यांनी निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. ही निवडणूक बिनविरोध होऊन श्री. अजित पंडित यांनी पुढील कालावधीसाठी नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा केली. माजी अध्यक्ष श्री. सुहास ढवळे काका यांनी नूतन कार्यकारिणीला अनुभवी मार्गदर्शन करून शुभेच्छा तर दिल्याच; पण त्यांच्या संघातील गेल्या २५ वर्षांच्या अनुभवाच्या पोतडीतून 'कमी तिथे मी' असे सांगून मला केंव्हाही बोलवा, मी संघासाठी वेळ काढून जरूर येईन, असेही सांगितले. नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष	श्री. श्रीराम देव,	**सदस्य**	श्री. दीपक पराडकर,
कार्याध्यक्ष	श्री. विजय आंबर्डेकर		श्री. प्रसाद पंडित,
कार्योपाध्यक्ष	श्री. शरद गणपत्ये व		श्री. विनय सांडू,
	श्री. अरु ण ढवळे		श्री. अतुल तांबे, सौ. अदिती तांबे,
कार्यवाह	श्री. हेमंत किर्लोस्कर,		सौ. अमृता किर्लोस्कर,
कोषाध्यक्ष	श्री. अनिल देव		सौ. भाग्यश्री सरपोतदार.

सर्व नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्यांचे हार्दिक – संदीप कळके

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड या संस्थेने ठाण्यातील येऊर येथील आदिवासी पाड्यांवर शैक्षणिक उपक्रम हाती घेतला आहे. सरासरी २० ते २५ मुले पटावर आहेत. संघाच्या अनेक सभासदांनी आर्थिक तसेच वस्तू रुपाने मदत केली आहे, करत आहेत. विशेष म्हणजे ज्ञातीबाहेरील अनेक जणांनी संस्थेच्या या कार्याकरिता मदत केली आहे. संस्थेच्या अकरा सभासदांचा शैक्षणिक प्रकल्पात प्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. आगामी उपक्रमात संस्थेतर्फे आदिवासी बांधवांकरिता रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाणार आहे.

श्री. श्रीपाद दामोदर सप्रे, कार्यवाह - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिकची सर्वसाधारण सभा दि. २० ऑगस्ट २०१७ रोजी झाली. या सभेत संघाची २०१७-२०१९ पर्यंतची नव्या कार्यकारिणीची निवडणूक होऊन खालील कार्यकारिणी अस्तित्वात आली.

नवे कार्यकारी मंडळ

श्री. नरेंद्र वासुदेव ताटके	अध्यक्ष	श्री. सुनील श्रीराम खरे	कार्यकारिणी सदस्य
ॲड. विनयराज शशिकुमार तळेकर	उपाध्यक्ष	श्री. सुभाष लक्ष्मण सावरेकर	कार्यकारिणी सदस्य
सौ. सुप्रिया प्रदीप फणसळकर	उपाध्यक्ष	श्री. हेमंत माधव नाखरे	कार्यकारिणी सदस्य
श्री. सुरेश महादेव जठार	सचिव	श्री. जयंत आत्माराम खेडेकर	कार्यकारिणी सदस्य
श्री. नरेंद्र सुरेश पराडकर	सहसचिव	श्री. रवींद्र मधुकर गोविलकर	कार्यकारिणी सदस्य
श्री. केतन विष्णू अमृते	कोषाध्यक्ष	श्री. पीयुष किरण निगुडकर	कार्यकारिणी सदस्य
सौ. मृणाल नितीन नानिवडेकर	सहकोषाध्यक्ष		

सर्व नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्यांचे हार्दिक अभिनंदन!

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, हुबळी

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, हुबळीची सर्वसाधारण सभा दि. ७ ऑगस्ट २०१७ रोजी झाली. या सभेत संघाची २०१७-२०१९ पर्यंतची नव्या कार्यकारिणीची निवडणूक होऊन खालील कार्यकारिणी अस्तित्वात आली.

नवे कार्यकारी मंडळ

श्री. रामचंद्र देव	अध्यक्ष	श्री. सुरेश हर्डीकर	सदस्य
श्री. श्रीपाद हेर्लेकर	उपाध्यक्ष	श्री. मोहन स्वादी	सदस्य
श्री. रमेश हेर्लेकर	कार्यावाह	डॉ. श्री. चेतन जायदे	सदस्य
श्री. वसंत स्वादी	कोषाध्यक्ष	श्री. उदय स्वादी	सदस्य
डॉ. श्री. विजय जायदे	सदस्य		

ह्या आधीचे अध्यक्ष श्री. अरविंद नाटेकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. विजया नाटेकर ह्यांनी सन २००४ पासून हुबळी संघ उभारणीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे आणि गेल्या सुमारे १३-१४ वर्षांत संघासाठी केलेल्या अथक परिश्रमांचे खूप कौतुक सर्वांना वाटते. त्यांनी हुबळी संघासाठी 'कायमस्वरूपी वास्तू' निर्माण केली, ही विशेष उलेखनीय बाबही कौतुकास पात्र आहे.

हुबळी संघाच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे

डिजिटल अवेअरनेस ट्रेनिंग :

दि. ९ आणि १० सप्टेंबर रोजी सकाळी आणि दुपारी अशा दोन तुकड्यांमध्ये कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांच्या कार्यालयात १८ जणांना (ज्येष्ठ सभासद) कॉम्प्युटर आणि मोबाईलची नव्याने त्यांना सोप्या वाटेल अशा भाषेत ओळख करून दिली. दोन दिवस आणि तेही एकूण ४ तास किती आणि काय शिकवणार? असा प्रश्न होता पण सगळ्यांनी तुम्ही आमच्या शंकाचे निरसन उत्तमरीत्या केले, हे असेच चालू द्या आम्ही येत राहू; असा विश्वास दिल्यावर कायमस्वरुपी हा उपक्रम सुरू राहील, असा प्रयत्न कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे करीत आहे. संघाचे श्री. लक्ष्मीकांत देसाई (अध्यक्ष), मकरंद फणसळकर आणि मुक्ता चांदोरकर यांनी यावर काम करा, अशी युवामंचाला सूचना केली होती. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेच्या कार्यकारिणीने ह्या ट्रेनिंगसाठी दृकश्राव्य माध्यम हवे म्हणून ;एक व्हिडीकॉनचा ३२ इंची टिव्ही घेऊन, वॉल माउन्टेड रिव्हॉलविंग ब्रॅकेटवर बसवला आहे.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी युवामंचाचे आदित्य पाध्ये, हृषीकेश पळसुले-देसाई, उमेश पाध्ये, सुजात मोघे, व्यकंटेश करंबेळकर, विश्वेश पावनसकर ह्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

श्रीगजानन गुर्जर

क. ब्रा. संघ, पुणे

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे

दि. २० ऑगस्ट रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे या संस्थेने महालक्ष्मी मंदिर येथे सत्यनारायण महापूजा व कीर्तन असा सोज्वळ सुंदर कार्यक्रम साजरा केला.

दुपारी ३ ते ४.३० दरम्यान पूजाविधी साग्रसंगीतरीत्या सादर झाला. प्रसाद वितरणानंतर पुढील कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

या दिवशी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे कार्यवाह श्री. गणेशजी गुर्जर उपस्थित होते. त्यांनी महासंघाच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला व 'संपर्क'च्या सदस्यत्वासाठी उपस्थित सभासदांना आवाहन केले.

श्री. गुर्जर यांच्या वक्तव्यानंतर ह.भ.प. श्री. सुभाषजी ताटके यांच्या सुश्राव्य संगीत कीर्तनाचा कार्यक्रम सुरू झाला. श्री. ताटके बडोदेकरच आहेत नामांकित गायक व अभिनेते असून त्यांच्या या गुणांमुळे कीर्तन अतिशय रसाळ असे झाले. त्यातून सभासदांना ज्ञानासहित मनोरंजन मिळाले.

श्री. ताटके आपल्या संघाचे मान्यवर सभासद असून संघाच्या कार्यक्रमांमध्ये त्यांचे नेहमी उत्तम सहकार्य असते. श्री. सुभाष ताटके यांना मनःपूर्वक धन्यवाद.

श्री. निळकंठ मुळ्ये
अध्यक्ष, क. ब्रा.संघ, बडोदे

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा

कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा वर्धापनदिन रविवार, दिनांक १३ ऑगस्ट २०१७ रोजी सुपनेकर हॉल, सातारा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सुरुवातीला कऱ्हाडे कुटुंबातील दिवंगतांना तसेच शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. गणेशवंदन व दीपप्रज्वलाने कार्यक्राची मंगलमय सुरुवात झाली. कीर्तन विशारद गुणकली शिंदे यांच्या सुश्राव्य कीर्तनाने प्रारंभ झाला. गुरुमहिमा व प्रयत्नवाद यावर निरूपण करताना त्यांनी संतांच्या जीवनचरित्रामधील अनेक दाखले दिले. व्यावहारिक तसेच पारमार्थिक जीवनात सातत्याने प्रयत्नांची कास धरणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी अत्यंत सोप्या व साध्या भाषेत विशद करून उपस्थितांची मने जिंकली. कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सचिव गणेश गुर्जर हे पुणे येथून कार्यक्रमासाठी आवर्जून आले होते. गुर्जर यांनी मनोगत व्यक्त करतांना महासंघाच्या सामाजिक बांधिलकीची तसेच विविध उपक्रमांची माहिती दिली. संघाचे अध्यक्ष अनिल काटदरे यांनी आपल्या प्रास्ताविकात संघाच्या वाटचालीचे सिंहावलोकन करतांना सांगितले की, साताऱ्यात अनेक गुणी कलाकार आहेत. त्यांना तसेच नवोदित कलाकारांना व्यासपीठ

उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो.

वर्धापनदिनाचे औचित्य साधून कऱ्हाडे कुटुंबातील विविध क्षेत्रांत नेत्रदीपक यश प्राप्त केलेल्या गुणवंतांचा, गुणी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा तसेच कलाकारांचा सत्कार गणेश गुर्जर व अनिल काटदरे यांचे शुभ हस्ते संपन्न झाला. काटदरे यांनी गुर्जर यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब भाटे यांनी केले. विजयाताई फणसळकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुधीर करंबेळकर, मानसी मोघे, श्रीकृष्ण शेवडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास कुटुंबीय मंडळी मोठ्या संख्येने उउपस्थित होती. कॉफीपांनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कऱ्हाडे ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी क.ब्रा.संघ रत्नागिरीचा उपक्रम

रत्नागिरी शहर आणि जवळपासच्या शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेऊन केवळ राहण्याची किंवा भोजनाची सोय नसल्यामुळे झालेली गैरसोय किंवा काही वेळा शिक्षण सोडून जाण्याची वेळ आलेल्या कऱ्हाडे ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी, रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या वसतिगृहात राहण्याची सोय होऊ शकते. इच्छुकांनी खालील दूरध्वनीवर त्वरित संपर्क साधावा.

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघ
०२३५२--२२४५७९
वेळ दुपारी २ ते ६
किंवा सौ. अर्चना लळित
९४०५७२८३४४
किंवा श्री. माधव हिर्लेकर
अध्यक्ष –९४२२३७५८

चौकट व्यवहाराची

व्यवहारी माणसांना जगण्याचे
असणारे फायदेदेखील काटेकोर असतात
स्वतःभोवताली त्यांनी आखलेल्या कुंपणातच
ही माणसं वावरत असतात

व्यवहारी जगण्यात मात्र
भावना जपायच्या नसतात
आपल्या पुरत्याच जगण्याच्या
दिशा ठरवायच्या असतात

दिले महत्त्व जर भावनांना
तर फसगत होते व्यवहारात
व्यवहारात फसलेले त्याच्या बाबतीत
भावनाच नसतात कुणाला

भावना जपणारे जगात
खरंच वेडे ठरतात
अन् व्यवहारात होतो जो यशस्वी
त्यांचा उदो उदो करतात

पण मृत्यूच्या दारात
व्यवहार आठवत नसतात
भावनेच्या नात्यामुळेच
खांद्याला खांदा लावताना सर्वजण दिसतात

श्रीपाद दामोदर टेंबे

स्थापनाः १० मे १९१७ | फोन नं. : २४४५६०४७ | मोबा. : ९८५०९७९७०६

शतकपूर्तीनंतरची दिमाखदार वाटचाल

मे. डी. व्ही. भाटवडेकर

क्लॉथ मर्चंट्स

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू.म.वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११०३०.
email : dwb10051917@gmail.com

सकाळी १० ते १ • दुपारी ४॥ ते ८॥ • सोमवार बंद

कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सूटिंग, लाँग क्लॉथ,
पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीट्स,
टॉवेल्स, रेडिमेड पायजमे,
बंडी - कुडते - बर्म्युडा - ३/४ पँट्स

खाद्यसंस्कृती - पौष्टिक बदाम

बदाम भिजवूनच का खावेत?

बदाम हे पौष्टिक गुणांनी भरलेले आहेत. बदामामध्ये व्हिटामिन ई, झिंक, कॅल्शियम् , मॅग्नेशियम, ओमेगा ३, फॅटी ॲसिड्स यासारखे अनेक पोषक घटक उपलब्ध असतात.

बदाम हे नेहमी पाण्यात भिजवून खाल्ले पाहिजेत. कारण भिजवल्यामुळे त्यावरील साल सहज निघून जाते आणि बदामातील पौष्टिक घटक आपल्याला सहजगत्या मिळतात.

बदामाचे फायदे

बदाम सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते, तसेच बदामाने काही काळ भूकदेखील भागवली जाते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध सेवन केल्यास सर्दीपडसे निघून जाते. डाएट कारणाऱ्या लोकांना बदाम भरपूर खाण्यास सांगितले जाते. त्यामुळे भूक कमी लागते आणि पोषणदेखील मिळते. भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खाल्यास ते बदाम एका ब्रेकफास्टचे काम करते.

मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदामाचे सेवन केल्यास शुगर लेव्हल नियंत्रणात रहाते. बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्ध करण्यास मदत करते.

त्वचा कोरडी असणाऱ्यांनी बदामाचे सेवन केल्यास त्वचेचा स्निग्धपणा वाढतो. बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणदेखील थांबते. दररोज बदाम खाल्यास हृदयातील रक्तवाहिन्यांतील रक्तप्रवाह सुरळीत होतो, तसेच हृदयाचे आजारदेखील दूर होतात असे संशोधनाअंतीदेखील दिसून आले आहे.

मात्र बदाम जास्त प्रमाणात खाऊ नयेत आणि त्याबाबत आपल्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घेऊनच त्याचे सेवन करावे.

संकलन

प्रमोद तांबे

गूळ-तूप पोळी

संध्याकाळी ४ ते ६ च्या दरम्यान खाण्यासाठी हा परिपूर्ण आहार आहे.

वडा-पाव, शेव-पुरी, सामोसा यांसारखे अरबट-चरबट पदार्थ खाण्यापेक्षा हा नक्कीच चांगला.

रात्रीचे जेवण आपोआप हलके होते व झोपताना पोट जड होत नाही.

पचनक्रिया चांगली राहते. ॲसिडिटी, डोकेदुखी, मलावरोध यासारखे त्रास होत नाहीत.

ऑफीसमध्ये डब्यात घेऊन जाण्यास सोईचे पडते.

घरून येतानाच एखाद् दुसरी चपाती डब्यात जास्त आणा किंवा दुपारच्या/रात्रीच्या जेवणातील एखादी वगळून ठेवा.

गूळ खाल्ल्यामुळे सर्दीखोकला होत नाही व रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

तूप हे सांध्यांसाठी नैसर्गिक वंगण आहे. पाठ, गुडघे, घोटे कंबर या वजन पेलणाऱ्या साध्यांचे यामुळे संरक्षण होते.

साजूक तूप आतड्याच्या आतील आवरण मजबूत करते, ॲसिडिटी कमी करते व भूक नियंत्रित करते.

संध्याकाळच्या वेळेस खाल्लेल्या पौष्टिक नाश्त्यामुळे रक्ततील साखरेचे प्रमाण व्यवस्थित राहते. आपल्या जीवनशैलीशी निगडित स्थूलत्व आणि डायबेटिससारखे आजार दूर राहण्यास मदत होते.

बंदोबस्ताच्या ड्युटीवर असलेला पोलिसवर्ग किवा हल्लीची उशिरा पर्यंत काम करणारी सॉफ्टवेअर इंडस्ट्रीमध्ये काम करणारी तरुण पिढी, यांना हा नाश्ता नेणे सहज शक्य आहे. विशेषतः पोलीसवर्गासाठी उपयुक्त आहे.

सहा वाजायच्या सुमारास थोडे तरी खाणे फार जरुरीचे आहे, कारण बहुतेक पोलीस रात्री साडेदहा नंतरच जेवू शकतात. त्यांना साधारणपणे दीड तास तरी घरी पोचायला लागतो.

आता वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे :

१) मला डायबेटिस आहे. मी तूप-गूळ- पोळी खाल्ली तर चालेल का...?

उत्तर : हो...! नक्कीच...!! रक्तातील साखरेवर यामुळे नियंत्रण राहील आणि संध्याकाळचे निकृष्ट खाणे बंद होईल.

सकाळ व रात्रीच्या जेवणादरम्यान बराच वेळ जातो, मध्ये तूप-गूळ-पोळी खाल्ली की, दोन जेवणांमधला वेळ कमी होईल. रात्री जास्त जेवले जाणार नाही, यामुळे निवांत झोप लागण्यास मदत होईल.

फास्टिंग ब्लड शुगर (सकाळी रिकाम्या पोटी केली जाणारी रक्तशर्करेची मापणी) नियंत्रणात राहील.

२) एका वेळेस मी किती चपात्या खाऊ शकतो/शकते...?

उत्तर : तुम्हाला गरज असेल तितके खा. खाल्ल्यावर तन आणि मन दोघांनाही उत्साही वाटायला हवे. पोळी - तूप- गूळ गुंडाळीच्या किंवा कुस्करून लाडूच्या स्वरूपात आणणे सोईचे होऊ शकते.

३) तुपातल्या कोलेस्टेरॉलचे काय...?

उत्तर : पाश्चात्य विकसित देशांतून हल्लीच मिळालेल्या आहार आरोग्याशी संबंधित सूचनांनुसार कोलेस्टेरॉल हे एक पोषक द्रव्य आहे आणि आहारातून मिळत असलेल्या कोलेस्टेरॉलवर मर्यादा घालण्याची काहीच आवश्यकता नाही. आपण उगीचच 'फॅट'ला आणि नेमकेपणाने सांगायचे तर कोलेस्टेरॉलला हृदयरोगासाठी दोषी ठरवतो.

कोलेस्टेरॉल व्हिटॅमिन 'डी'च्या शोषणासाठी तसेच सेक्स हार्मोन्सची पातळी व्यवस्थित राहण्यासाठी गरजेचे असते, यामुळे PCOD आणि थायरॉईडसारख्या व्याधी टळतात.

तूप जरूर वापरा, कारण त्यामुळे सांधेदुखीला आराम पडेल. ॲसिडिटी व ब्लड शुगर नियंत्रणात राहील.

बहुतेक उशिरापर्यंत काम करणाऱ्यांना यातील सर्व नाही, पण एखादी तरी व्याधी सतावते. मात्र ज्यांना मधुमेह (डयबेटीस) आहे, अशांनी गुळ-तुपाचे जेवणातील प्रमाण हे त्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने ठरवावे. संध्याकाळी तूप-गूळ-पोळी खाणे म्हणजे या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी उचललेले एक पाऊल आहे.

४) सकाळी चहा-चपाती ऐवजी तूप-गूळ-पोळी खाऊ का...?

उत्तर : हो...खाऊ शकता...

कुठल्याही वेळेस खाण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे.

ऋजुता दिवेकर

कडबोळी : (अठरा धान्यांची कडबोळी)

साहित्य : तांदूळ, ज्वारी, गहू, बाजरी, हरभरे, मूग, मटकी, चवळी, मसूर, हुलगे, नाचणी, उडीद, वाटाणा, वाल, तूरडाळ, धने, तीळ, ओवा, तिखट, मीठ, काळा मसाला, तेल.

कृती : वरील सर्व धान्ये प्रत्येकी एक वाटी घ्यावीत. हरभरे, मूग व उडीद ही धान्ये शक्यतोवर सालासकट घ्यावीत. न मिळाल्यास त्यांच्या डाळी घेतल्या तरी चालेल. तसेच तुरीच्या डाळीऐवजी सालासकट तूरच मिळाल्यास चांगले. वरील सर्व धान्ये भाजून घ्यावीत व एकत्र करून दळावीत. नंतर त्या पिठात एक वाटी तेल तापवून घालावे आणि एक वाटी तीळ, एक वाटी तिखट, हळद व चवीप्रमणे मीठ व काळा मसाला घालावा. आवडत असल्यास थोडा ओवाही घालावा. नंतर त्या पिठात दोन-तीन वाट्या उकळते पाणी घालावे. नंतर ते पीठ गार पाण्यात भिजवून चांगले मळावे. नंतर कडबोळी करून तेलात मंद पण खरपूस तळून काढावीत. ही कडबोळी चवीस चांगली लागतात व कुरकुरीत राहतात.

कमलाबाई ओगले

तांदळाचे अनरसे

साहित्य : जुने तांदूळ (चिकट तांदूळ घेऊ नयेत), दळलेली साखर अगर गूळ, तूप, खसखस.

कृती : तांदूळ भिजत घालून तीन दिवस ठेवावेत. तिसऱ्या दिवशी तांदूळ धुऊन-निथळून घेऊन फडक्यावर पसरून कोरडे करावेत. किंचित ओलसर असतानाच ते काढावेत व पिठाच्या चाळणीने त्यांचे पीठ चाळावे. नंतर जेवढे तांदूळ घेतले असतील तितकाच गूळ अगर दळलेली साखर घ्यावी. दोन वाट्या पिठात चार चमचे या प्रमाणात तूप घ्यावे. नंतर पीठ, गूळ अथवा साखर व तूप एकत्र करुन एकजीव होईपर्यंत चांगले कुटावे. चांगले मऊ झाल्यावर त्याचे लाडवासारखे गोळे करुन डब्यात ठेवून द्यावेत. पाच-सहा दिवस ठेवून दिल्यानंतर अनरशासाठी पीठ तयार होते. गोळे ठेवल्यानंतर दुसऱ्या दिवशी उघडून पाहावे. फार कोरडे वाटल्यास केळीचे पान अगर एखादे केळे डब्यात ठेवावे. एक-दोन दिवसांत पीठ मऊ होईल. हे पीठ पुष्कळ दिवस टिकते व अनरसे केव्हाही करता येतात.

अनरसे करावयाच्या वेळी पिठाची पेढ्याएवढी गोळी करून घेऊन ती गोळी खसखशीवर किंवा खसखस आणि साखर यांच्या मिश्रणावर किंवा नुसत्या साखरेवर एका बाजूने दाबून घेऊन ती प्लॅस्टिकच्या कागदास तूप लावून त्यावर थापावी किंवा लाटण्याने लाटावी. नंतर मंद विस्तारावर तुपात तळावे. अनरशाला चांगली घरे पडतात व ते हलके होतात.

कमलाबाई ओगले

गुरूपालट

दिनांक १२/०९/२०१७ रोजी मंगळवारी ०६:५३ वाजता गुरू ग्रहाने तुला राशीत प्रवेश केला आहे.

आपल्याला आपल्या राशीनुसार गुरू ग्रहाचे गोचर भ्रमण फळ कसे असणार, ते पुढे वर्णन केले आहे.

कर्क, मीन व वृश्चिक या राशीला ४-८-१२ वा गुरू येत असल्याने त्यांनी आणि लोहपादाने ज्या राशीस येत आहे त्यांनी पीडापरिहारार्थ गुरूच्या उद्देशाने जप, दान, पूजा अवश्य करावी. तुला, सिंह, वृषभ, मकर या राशींना १-३-६-१० वा येत असल्याने त्यांनी जप, दान, पूजा करावी यामुळे ग्रहाची पीडा आपल्याला होणार नाही.

तुला राशीत प्रवेश करणार गुरू मला कितवा आहे, कसा आहे, अशी सध्या रोज विचारणा सुरू असते.

ज्योतिषशास्त्रातील काही माहिती असो अथवा नसो परंतु पूर्वीपासून कोणाकडून ऐकत असलेला ज्योतिषशास्त्रातील वरवरचा भाग सर्वांना माहीत असतो अथवा जाणून घेण्याची उत्सुकताही असते. त्यात मग ४, ८ आणि १२ हा खडतर, त्रासदायी, कष्टप्रद असा असतो आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे १२ वा गुरू मुलीच्या विवाहात अडचणी देणारा, 'गुरुबळ' नाही, अशी माहिती लोकांमध्ये प्रचलित आहे कुठलाही ग्रह ४, ८, १२ गोचर हे वाईट परिणाम देणारे थोड्या फार प्रमाणात असते, त्यात गुरू असा वेगळा अपवाद नाहीच आहे. जन्मकुंडलीतील कोणत्या स्थानात भ्रमण परिणाम देणार आहे, तेदेखील महत्त्वाचे ठरते. सध्या तरी एवढेच की कर्क (चौथा), वृश्चिक (बारावा), मीन (आठवा) या राशीला परिणाम- ४था गुरू सुरू असेल त्यांनी घरात वाद टाळा. ८ वा आणि बारावा गुरू सुरू असेल तर गाडी हळू चालवावी, कुणास पैसे उधार देणे, शेअर मार्टेकमध्ये खूप पैसा लावणे टाळावे या राशीना सतत आजार, मन स्थिर न राहणे, सर्वांशी भांडण होणे, पोटाचे आजार होणे, अपघात होणे, कोणत्याही कामात यश न येणे, नुकसान होणे, होणारी कामे थांबणे, अफाट खर्च होणे, अशा अनेक गोष्टी होण्याची शक्यता आहे.

१२ वा गुरू मनासारखे न घडणारे असा असतो परंतु तो आध्यात्मिक प्रगती निश्चित करतो. गुरूभक्तीची वाढ निर्माण करतो.

मग या ४, ८ आणि १२ व्या गुरूचा आपण कसा परिणाम भोगायचा याची तयारी तुमची तुम्ही थोड्याफार प्रमाणात करू शकता...!!!

कोणत्या राशीत गुरू अनिष्ट फल देणार-

कर्क, वृश्चिक, मीन या राशींना चौथा, आठवा, बारावा असल्याने तसेच तुला, सिंह, वृषभ, मकर या राशींना पहिला, तिसरा, सहावा, दहावा येत असल्याने या राशीच्या व्यक्तींनीं जप, दान करणे विशेष फलदायी आहे.

गुरू तुला राशीत गेल्यावर मेषेला- सातवा, वृषभेला- सहावा मिथुनेला- पाचवा, कर्केला- चौथा सिंहेला- तिसरा, कन्येला- दुसरा तुळेला-पहिला, वृश्चिकेला- बारावा धनुला-अकरावा, मकरेला- दहावा कुंभेला-नववा, मीनेला-आठवा येत आहे.

राशी	पाद	फल
वृषभ, कर्क, धनु	सुवर्ण	चिंता
मेष, कन्या, मकर	रौप्य	शुभ
सिंह, वृश्चिक, मीन	ताम्र	श्रीप्राप्ती
मिथुन, तुला, कुंभ	लोह	कष्ट

पुण्यकालात जप, दान, पूजा, बृहस्पती शांती करावी किंवा पीडापरिहारक दान करावे. वस्तू:-

सुवर्ण, कांसे, पुष्कराज, हरभऱ्याची डाळ, गूळ, पिवळे वस्त्र, बृहस्पतीची सुवर्ण प्रतिमा दान करावी.

दानाचा मंत्र :-

बृहस्पति प्रीतिकरं दानं पीडा-निवारकम् ।

सर्वापत्ति विनाशाय द्विजाग्र्याय ददाम्यहम् ।।

असा मंत्र म्हणून वरील वस्तू दान करावी.. आणि

मंत्रः

देवानांच ऋषिनांच गुरूं कांचन सन्निभम्।

बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम्।।

गुरु मंत्राचा जप १९००० हजार करावा अथवा

या मंत्राचा जास्तीत जास्त वेळा नेहमी मनात उच्चार करावा.

१) श्री गुरू देव दत्त
२) दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा
३) श्री गुरू नृसिंहसरस्वती महाराज की जय
४) श्री स्वामी समर्थ
५) किंवा आपल्या श्री गुरुचे नाव उच्चार

६) श्री गुरू सेवा करा आणि गौसेवा करा

७)श्री क्षेत्र गाणगापुर व श्री क्षेत्र नसोबाची वाडी येथे जाऊन श्री गुरू नृसिंहसरस्वती दत्तमहाराजांचे दर्शन घेणे व घरात श्री गुरुचरित्र पारायण करावे

८)श्री पिंपळ वृक्षाला रोज २१, ५१,१०८ प्रदक्षिणा करा व गुरुवारी उपास फक्त फल आहार करावा

स्नान : उंबर, बेल, वड, आवळा यांची फळे सुवर्णाच्या पात्रात पाणी घालून स्नान केले असता गुरुपीडा दूर होते, असा पण एक प्रघात आहे.

श्रीगजानन गुर्जर
ज्योतिष विशारद
मो. : ८८०६३९५८८०

वाचकांचा पत्रव्यवहार

र.के. करंबेळकर
२०२, विनायक अपार्टमेंट
माई कॉम्प्लेक्स, नवघर रोड
मुलुंड पूर्व, मुंबई-८१
दि. 30.7.2017

मा. संपादक,
संपर्क कार्यालय
पुणे-30.

स.न.वि.वि.

मी आपल्या 'संपर्क' मासिकाचा सभासद असून (क्र.२४१५) नियमीत वाचक आहे. आपले सर्व अंक दर्जेदार असून मांडणी उत्कृष्ट आहे. यामुळेच ते संग्रही ठेवण्यासारखे झाले आहेत. हे आपले व आपल्या सहकार्यांचे यश आहे. अभिनंदन!

कळावे,

आपला स्नेहांकित,
र.के. करंबेळकर
(M.No.9869011298)

संस्थापक
कै. वासुदेव महादेव जावडेकर

सातारी पेढा शॉप

स्थापना-१९३६

मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

पौष्टीक खाद्य भांडार

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

नामांकन - (नॉमिनेशन)

तुमच्यानंतर तुमच्या नॉमिनीलाच पैसे मिळतील का? या प्रश्नाचे उत्तर तुम्ही off cource! असेच द्याल; पण तरीही पुन्हा विचारतो !

तुम्ही तुमच्या आयुष्यात फिक्स्ड डिपॉझिट, PPF, इन्शुरन्स पॉलिसी, म्युच्युअल फंड आणि शेअर्समध्ये पैसे टाकले असतील; पण तुमच्यानंतर हे पैसे तुमच्या नॉमिनीला मिळतील याची तुम्हाला खात्री आहे का?

'Nomination' बद्दलच्या कायद्याची तुम्हाला माहिती आहे का?

तुम्ही आयुष्यात ज्यांच्यासाठी मेहनत घेता, काबाडकष्ट करता, इन्व्हेस्टमेंट करत असता; ती असतात तुमची मुलं, बायको, आई, बाबा आणि भावंड. जर आपल्याला काही झाले, तर तुम्ही यामधील कुणाला तरी नॉमिनीसुद्धा केलेलं असतं; पण तुमच्यानंतर पूर्ण पैसा तुमच्या नॉमिनीलाच मिळेल का?

तर, उत्तर आहे- नाही (शॉकिंग?)

खालील उदाहरण पाहा !

अरविंद हा ६५ वर्षांचा माणूस आहे, ज्याचे आपल्या मुलांशी अजिबात पटत नाही. अरविंदने आपली इन्शुरन्स आणि म्युच्युअल फंडामधील संपूर्ण मिळकत बायकोच्या नावे नॉमिनी म्हणून ठेवलेली आहे.

अरविंदला अचानक ॲक्सिडेंट झाला आणि त्यातच त्याचे निधन झाले. त्याने बायकोलाच नॉमिनी ठेवलेलं होतं पण मुलं संपत्तीसाठी कोर्टात गेली. कोर्टाने इन्शुरन्स व म्युच्युअल फंडातील संपत्तीचे बायको व मुलांमध्ये समान भाग केले आणि त्याच्या बायकोच्या वाट्याला फक्त छोटासा हिस्साच आला!

असे का झाले?

अरविंदने बायकोला नॉमिनी ठेवले होते, पण त्याने 'legal will' बनवले नव्हते. त्यामुळे त्याच्यानंतर त्याच्या संपत्तीची वाटणी ही 'Succession Law' नुसार झाली आणि सर्व 'Legal Heir' मध्ये समान वाटणी झाली.

'Succession Law' समजून

॥श्री॥
स्थापना : गणेश चतुर्थी १९९३
सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा
प्रकाश जठार यांचे
ज्योती एन्टरप्रायझेस
(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व
सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)
पत्ता - गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन - ४२१२०१,
फोन-०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी - ९८१९२५१४१२

घ्या! 'Succession Law' नुसार नॉमिनी हा फक्त ॲसेट्सचा (पैशाचा) Trustee आहे, मालक नाही.

नॉमिनी ॲसेटला होल्ड करू शकतो पण ॲसेटचे, (पैशाचे) चे खरे मालक हे तुमचे 'Legal Heir' च असतात. मग 'Legal Heir' कोण असतात?

'Legal Heir' ते असतात, जे तुमच्या 'Legal Will' मध्ये तुम्ही मेन्शन करता. जर तुम्ही 'legal Will' केले नसेल, तर 'Succession Law' नुसार तुमचे 'Legal Heir' ठरवले जातात.

'Succession Law'चे कायदे हे इन्व्हेस्टमेंटनुसार बदलतात. म्हणजे तुम्ही केलेल्या फिक्स्ड डिपॉझिट, PPF, इन्शुरन्स पॉलिसी, म्युच्युअल फंड आणि शेअर्स यांसाठी थोडे वेगवेगळे कायदे आहेत.

मित्रांनो, इन्व्हेस्टमेंट करणे ही काळाची गरज आहे तेवढेच त्याचे कायदे (Law) माहिती असणे हेसुद्धा महत्त्वाचे आहे.

नाही तर तुमची जीवनभराची पुंजी अशीच वाटली जाईल आणि तुमच्या नॉमिनीला हवा तेवढा फायदा होणार नाही!

तेव्हा लक्षात ठेवा फक्त नॉमिनेशन करुन भागणार नाही, तर वकीलाच्या सल्ल्याने स्वतःचे इच्छापत्र (Will) सुद्धा करुन ठेवा. ज्यामुळे तुमच्यानंतर, तुमच्या इच्छेनुसार तुमच्या इस्टेटीतील वाटा वारसांना मिळेल.

श्रीगजानन गुर्जर
M.Com, LL.M., C.A.I.I.B.

दिवाळी रटाळ

दिवाळी सकाळ.. नव्हे, दिवाळी रटाळ ।।
रवा बेसन लाडू
कसं त्याला वळू?
पाक झाला जास्त
भुगाच द्यावा रास्त
पिवळी चकली
तेलात तळली
सुंदर काटेरी
पण किती मऊ ती!
दिवाळीच्या करंज्या
ताटात मोजल्या
काय त्या भरल्या
खडखडा वाजल्या
कसला फराळ.. दिवाळी रटाळ ।।१।।

तडतडी फुलबाजी
काय रुबाब तरी
पेटता पेटेना
टाकता येईना
ॲटम बॉम्ब तो
घाबरून सोडतो
वातच तुटली
कसा पेटेल तो?
चिमन चिडी
इवलीशी वडी
तिरकी उडाली
घरातच आली
फटाके बेकार... दिवाळी रटाळ ।।२।।
मुलांचे कपडे
रेडिमेड घेतले
काही झाले तोकडे
काही उसविलेले

साड्यांचा सेल
'ही' आलबेल
खरेदी सिल्कची
फसली सपशेल
नवीन बुटाचा
सोलच निघाला
दुकानदार म्हणाला
दिवाळी नंतर या
मनात शिवीगाळ...दिवाळी रटाळ ।।३।।
नळाचा वॉशर
तेवढ्यात तुटला
प्लंबर आला
दिवाळी मागायला
गॅस तो कसला
दिवाळीत संपला
दुकानच बंद
हताश झालो बुवा!
बोनस होईल
दिवाळीआधी
कसलं काय
केली खरेदी
त्रस्त हा काळ.. दिवाळी रटाळ ।।४।।

दाराशी रांगोळी
मुलीने काढली
कुत्र्याने रांगोळीची
वाट लावली
अंक दिवाळीचे
सुमार सगळे
जाहिरातीने भरले
काय वाचू त्यातले?
घासाघाशी करून
कंदील घेतला
रिक्षेत बसताना
साफ चेपला
निरुत्साहचा सुकाळ...दिवाळी
रटाळ।।५।।
किती कटकटी
कसली दिवाळी
कसली चंगळ
कसलं मंगल
नशीबच नाठाळ.. दिवाळी रटाळ ।।६।।

-प्रदीप पु. सातवळेकर
मुलुंड (पूर्व)



nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
~SWEETS~

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - +91251 2482106, +91251 2483476.
•SHOP NO.1: Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - 97026 55000.
•SHOP NO.2: Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - +91251 2433193. Mo. - 9702811122.

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) 0251 - 2860720, 9702666000, Fax: 2483351.
Email: ynakhye@gmail.com
Website: www.shubhamangalhall.com

EVEREST
~ HALL ~

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west)
Tel.: 9702622000, 9702011131

EVEREST
DISTRIBUTORS

DISTRIBUTORS FOR
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: +91 251- 2483476, 2482106.
Fax: +91 251- 2483351. Email: anakhye@gmail.com

finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: 91251 2480305

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या वतीने
'Armed Forces Flag Day Fund' निधीसाठी ३४ लाख रुपये



कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या वतीने ७० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त तसेच सैन्यदलांच्या सन्मानार्थ रविवार, दिनांक ६ ऑगस्ट २०१७ या दिवशी सायंकाळी ५ ते रात्रौ ९ पर्यंत रवींद्र नाट्य मंदिरए प्रभादेवी, मुंबई येथे 'श्रावणसंध्या' हा कार्यक्रम संपन्न झाला. देशासाठी प्राणार्पण केलेल्या आपल्या वीरपुत्रांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना तो समर्पित करण्यात आला होता.

भारताचे सन्माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सर्वांच्या सहभागाने 'Armed Forces Flag Day Fund' निधीसाठी संघाच्या कार्यकर्त्यांनी दिनांक ५ ऑगस्टपर्यंत जमा केलेल्या निधीची घोषणा करण्यात आली. १२७४ धनादेशांच्या व कॅनरा बँकेत उघडलेल्या KBS MUMBAI AFFDF खात्याच्या माध्यमातून ३४ लाख रुपये 'श्रावणसंध्या' या कार्यक्रमात जमा झाल्याचे जाहीर केले गेले. कार्यक्रमादरम्यान वीरपुत्रांना व त्यांच्या कुटुंबीयांना आमदार श्री. मंगलप्रभात लोढा तसेच मुंबई संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व चांदीची समई देऊन सन्मानित करण्यात आले. जमा झालेला सर्व निधी केंद्रीय सैनिक बोर्डाच्या मुंबई कार्यालयात नंतर सुपूर्द करण्यात आला.

भारतीय सैन्याच्या पराक्रमाच्या व शौर्याच्या कथांचा समावेश असलेली स्मरणिका यानिमित्ताने प्रसिद्ध प्रवचनकार श्री. सु. ग. शेवडे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. प्रसिद्ध संगीतकार कमलेश भडकमकर यांनी स्वरबद्ध केलेला आदित्य खेर निर्मित सिम्फनी प्रस्तुत 'माँ तुझे सलाम' हा देशप्रेमावर आधारित सांगीतिक कार्यक्रम या वेळी सादर करण्यात आला. मयूरेश साने यांच्या हृदयस्पर्शी निवेदनाने आणि मधुरा कुंभार, नचिकेत लेले, किरण शेंबेकर, जयदीप भागवडकर, अदिती प्रभुदेसाई यांनी मधुर आवाजात सादर केलेल्या देशभक्तिपर गीतांनी उपस्थित रसिकांची मने जिंकून घेतली. या वेळी प्रसिद्ध कोरिओग्राफर चेतन शिवगण यांच्या नृत्यदिग्दर्शनाखाली आशिष पाटील, राहुल पाटील, मीनाक्षी पोंक्षे, जान्हवी छत्रे, सुशील पाटील व चेतन शिवगण तसेच चेतन डान्स स्टुडिओच्या कलाकारांनी नेत्रदीपक सादरीकरण केले.

मुंबई संघाच्या कार्यकारिणीने व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाअगोदर सुमारे ४५ दिवस स्वतःला या कार्यात झोकून दिले होते. त्यांनी संघाप्रति दाखविलेल्या प्रेमामुळेच मुंबई संघ या उपक्रमात मोठे यश संपादन करू शकला. मुंबईच्या या उपक्रमाला सर्वच कऱ्हाडे संघांचे मोलाचे सहकार्य लाभले. ठाणे, मुलुंड, डोंबिवली, पुणे, रत्नागिरी, कोल्हापूरपासून थेट बडोदा, बंगलोरपर्यंत सर्वच कऱ्हाडे संघांनी हा उपक्रम आपला मानून यात सहभाग नोंदविला. महासंघाच्या कार्यकारिणीने केलेल्या आवाहनाने सर्व कऱ्हाडे ज्ञातिबांधवांना या निमित्ताने एकत्र आणण्याचे मोठे कार्य केले आहे. सैनिकांप्रति आदर व ज्ञातीप्रति प्रेम व्यक्त करून या उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या महासंघाचा व सर्व कऱ्हाडे संघांचा; मुंबई संघ मनःपूर्वक आभारी आहे. या यशस्वी उपक्रमाने समाजात कऱ्हाडे ज्ञातीप्रति आदर व सन्मान निश्चितच वाढला आहे.

आपल्या अभिनव व यशस्वी उपक्रमाने सैनिकांप्रति सन्मान प्रकट करून ज्ञातीबांधवांना देशप्रेम व ऐक्याची प्रेरणा देण्याचा प्रयत्न मुंबई संघाने केला आहे. हाच या उपक्रमाचा खरा उद्देश होता, असे मुंबई संघ मानतो.

विजय ज. आंबर्डेकर
कार्याध्यक्ष, क.ब्रा.संघ, मुंबई

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:

संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३०

To,